MAHARASHTRIYA JNANAKOSHA MANDALA LTD, NAGPUR.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लि. नागपूर.

महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि

[१८१०-१९१७]

डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए. पीएच्. डी.

यांच्या प्रस्तावनेसह

हा ग्रंथ महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या मुख्य संपादकांच्या आज्ञेनें ज्ञानकोश मंडळाच्या लेखकांसाठीं तयार केला.

संपादक

यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एलएल. बी.

रामचंद्र त्र्यंबक देशमुख, बी. एजी.

प्रकाशक मंडळातर्फे

रा. रा. श्रीधर व्यंकटेश केतकर.

ज्ञानकोश कार्यालय नागपूर.

१९१९.

मुद्रक.

रा. महादेव कृष्ण पाध्ये, बी. ए. बी. एल.

देशसेवक प्रेस, क्रॅडॉक टाऊन, नागपूर.

उपयोग करणारांस संपादकीय सूचना.

(१) प्रस्तुत ग्रंथाची मुख्य अनुक्रमणिका येणेंप्रमाणें.

वरील विभागांतील नवव्या व अकराव्या भागांचें पृथक्करण येणें प्रमाणें:—

(२) प्रस्तावना:—या भागांत डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर. एम्. ए. पीएच्. डी. यांनीं वाङ्मयाभ्यास कसा करावा याचें आणि महाराष्ट्रवाङ्मय व मराठी भाषा यांचा क्षय अगर वृद्धी कशी होत जात आहे याचें आंकड्यांच्या साहाय्यानें दिग्दर्शन केलें आहे; व मराठी वाङ्मय व भाषा यांची इतर वाङ्मयें व भाषा यांच्याशीं तुलना करून महाराष्ट्रीय वाङ्मय व भाषा यांच्या संकोच विस्ताराचीं कारणें दिलीं आहेत. महाराष्ट्रवाङ्मय व हिंदुसंस्कृति यांच्या आभ्युदयार्थ उपायांची चर्चा केली आहे. लेखांतो हीच प्रस्तावना साररूपानें दिली आहे.

ज्ञानकोशांतील वाङ्मयविषयक लेख लिहिणारांनीं या प्रस्तावनेंत विचार केलेल्या वाङ्मयाभ्यासाच्या अंगाचें अधिक सूक्ष्म अवलोकन करावें.

(३) ग्रंथकारनामसूचि:—या भागांत ग्रंथकार व लेखक यांच्या नांवांची अकारविल्ह्यानें यादी दिली आहे. या यादीची रचना पुढील नियमाप्रमाणें केली आहे.

प्रत्येक अक्षरांत प्रथम उपलब्ध आडनांवें, नंतर उपलब्ध ग्रंथकारांचीं स्वतःचें व बापाचें अशीं नांवें, नंतर टोपण नांवें, व नंतर प्रकाशकांचीं नांवें या प्रमाणें प्रत्येक नामावली अकारविल्ह्यानें लाविली आहे. उदाहरणार्थ क अक्षरांत घातलेलीं नांवें घेऊं. ज्या लेखकांचीं आडनांवें उपलब्ध असून तीं 'क' च्या बाराखडींतील अक्षरानें आरंभ होतात; त्यांची प्रथम वर्णानुक्रमानें रचना केली आहे. नंतर ज्यांचें आडनांव उपलब्ध नाहीं, केवळ स्वतःचें नांव व बापाचें नांव उपलब्ध आहे, व स्वतःचें नांव 'क' च्या बाराखडींतील अक्षरानें आरंभ होत असेल त्यांची पुन्हा अकारविल्ह्यानें रचना केली आहे. यानंतर वरील क्रमानेंच टोपण नांवांची रचना केली आहे व सदर प्रमाणेंच पुढें प्रकाशकांचीं नांवें दिलीं आहेत.

उदाहरणार्थ—

१ करकरे २ काथवटे ३ कोठेकर ४ काशीनाथ नारायण ५ कृष्णाजी सखाराम ६ कुमुद ७ कुसुम ८ कानिटकर

आणि मंडळी. पूर्ण नांवापुढें कंसात त्याच्या आद्याक्षरांचें लघुनाम ज्या अनुक्रमानें आम्ही मुख्य यादीमध्यें घातलें आहे त्या अनुक्रमानें दिलें आहे व पुढें ज्या पृष्ठांत त्याच्या ग्रंथाचा अगर लेखाचा निर्देश केला आहे तीं पृष्ठें दिलीं आहेत. मूळ लेखांत संक्षिप्त नांव पाहिल्यानंतर अंत्याक्षरानें सुरवात होणारीं आडनांवें पाहून, संक्षेप कोणत्या नांवाचा आहे तें नांव शोधून काढावें.

कांहीं संक्षेप विशेष आहेत ते येणे प्रमाणें:—

अ—अनंततनय.
आर —आनंदीरमण.
आव—आनंदीवल्लभ.
का—कारखानीस महादेव काशीनाथ.
कृ—कुळकर्णी कृष्णाजी बाबाजी.
के आणि केत—केशवसुत.
गु—गुर्जर विठ्ठल सीताराम.
गो—गोविंदाग्रज.
चंद्र—चंद्रशेखर.
टि—टिळक नारायण वामन.
टे—टेकाडे आनंद कृष्णाजी.
ठों—ठोंबरे त्र्यंबक बापूजी.
दु—तिवारी दुर्गाराम आसाराम.
ना—नागेश.
नामा—नाथमाधव.
ए—निफाडकर एकनाथ यादव.
शं—पुरोहित शंकर गजानन.
पे—पेठे केशव वामन.
बे—बेहेरे नारायण केशव.
बा—भिडे बाळकृष्ण अनंत.
वि—भिडे विद्याधर वामन.
मा—माधवानुज.
मं—मंजुवाळ.
र—रणदिवे दत्तात्रय भिकाजी.
न—रहाळकर नरहर शंकर.
रार—राधारमण.
रें—रेंदाळकर एकनाथ पांडुरंग.
लें—लेंभे विठ्ठल भगवंत.
लों—लोंढे मोरे गणेश.
व—वसंतविहार.
वागो—आपटे वासुदेव गोविंद.
विरा—विश्वनाथ काशीनाथ राजवाडे.
शासी—शारदाश्रमवासी.
सकृ—सहकारी कृष्ण.
सीत—सीताकांत.
सु—सुमंत.

अकारविल्हा लावतांना रूढ मराठी वर्णमालेप्रमाणें व बाराखडीप्रमाणें लाविला आहे. म्हणजे क्ष व ज्ञ हीं निराळीं अक्षरें धरलीं आहेत; 'कं' हें अक्षर 'कौ'च्या नंतर योजिलें आहे. इतर अनुस्वारयुक्त वर्ण त्या त्या वर्णांतच पण शेवटीं दिलें आहेत. जसें—भांगले हें नांव भावे याच्या नंतर पण भिडेच्या पूर्वी दिलें आहे. मात्र भंडारी हें 'भो'च्या नंतर येईल.

(४) **चिन्हें**—जीं पुस्तकें मुंबई मराठीग्रंथसंग्रहालयांत उपलब्ध आहेत त्यांच्या मागें गुणिले चिन्हाची '×' खूण केली आहे. कट्यारीची † खूण जेथें असेल तेथें त्या पुस्तकाच्या खऱ्या नांवाविषयीं आम्हास संशय असून नांवाच्या इंग्रजी भाषांतरावरून पुन्हा भाषांतर करून तें नांव तयार केलें आहे असें समजावें. अधिक चिन्हानें + अंकित असलेलें पुस्तक आमच्या माहितीप्रमाणें सरकारजमा आहे असें समजावें.

(५) **वर्गीकरण पद्धति**—पुस्तकांचें वर्गीकरण विषयवारीनें केलें आहे. मुख्य भाग १२ केले आहेत व ते १२ स्वरांनीं निर्दिष्ट केलेले आहेत जसे इतिहास व भूवर्णन (अ), कला (आ), कायदा (इ) वगैरे. प्रत्येक विषयाचे पुन्हां कांहीं भाग करून ते या स्वरापुढें व्यंजन ठेऊन निर्दिष्ट केले आहेत जसें:—मानवशास्त्र व मानवेतिहास (ऐ); मानवशास्त्र व मानवेतिहास—अर्थशास्त्र (ऐख). या भागाचा पुन्हां पोटविभाग पाडावयाच्या वेळीं त्यांतील व्यंजनांत निरनिराळे स्वर मिळवून बाराखडी केली आहे. जसें-मानवशास्त्र व मानवेतिहास-अर्थशास्त्र—व्यापार (ऐखे). यानंतर आणखी पोट विभाग म्हणजे व्यापार या विषयाचा पोटविषय दर्शविणें असल्यास त्यास य, र, ल इ. पैकीं अनुक्रमें एक एक अक्षर जोडावयाचें व आणखीही पोटविषय करणें असल्यास पुन्हा या य, र, ल, इत्यादि वर्णांस निरनिराळे स्वर जोडावयाचे. या प्रमाणें या निरनिराळ्या विषयांस चिन्हाक्षरें तयार केलीं आहेत, त्यांचें सूत्र येणें प्रमाणें:—

अचोपि व्यंजनं गोत्रं सस्वरं गोत्रजं कुलम् ।
यादयस्तस्य भेदास्तु तद्भेदाः स्वरदर्शिताः॥

प्रत्येक विषयामध्यें प्रथम अनुक्रमांक, नंतर पुस्तकाचें नांव, नंतर कर्त्याच्या नांवाचीं आद्याक्षरें, व शेवटीं प्रसिद्ध झाल्याचा इसवी सन दिला आहे. लेखाच्या बाबतींत लेखाचें नांव, नंतर लेखकाचें नांव, पुढें नियतकालिकाच्या नांवाचीं

संक्षेपाक्षरें व शेवटीं नियतकालीकाच्या वर्षाचा आंकडा या अनुक्रमानें माहिती दिली आहे.

(६) निवडक नियतकालिकें व इतर समुच्चयग्रंथ मिळून सुमारें ११० निरनिराळ्या नांवांच्या समुच्चयग्रंथांत प्रसिद्ध झालेल्या लेखांची विषयवारीनें वर्गीकरण करून यादी दिली आहे. समुच्चयग्रंथांची वर्गीकरणपद्धति पुस्तकांप्रमाणेंच असून एकाच विवक्षित चिन्हाक्षराखालीं एकच विवक्षित विषय येईल अशी योजना केली आहे.

पृथक्करणास घेतलेले समुच्चयग्रंथ व त्यांचीं संक्षेपाक्षरें येणें प्रमाणें.

अबलामित्र—अमि.
अरण्यपंडित—अरण्यपंडित.
आचार्य—आचार्य.
आध्यात्मिकज्ञानरत्नावली — आज्ञार.
आनंद—आ.
आर्यभगिनी—आभ.
आर्यभित्रक — आभि.
आर्यमित्र—आमि.
इतिहाससंग्रह—इसं.
उद्यान—उ.
उपनिषत्प्रकाश—उपनिषत्प्रकाश.
उपयुक्तज्ञानसार—उपयुक्तज्ञानसार.
उषा—उषा.
ऐतिहासिक लेखसंग्रह—ऐ.
कन्याशिक्षक—कशि.
कविचरित्र—कच.
कादंबरीकल्पद्रुम—काक.
काव्यरत्नावली—कार.
काव्यसंग्रह—कासं.
काव्येतिहाससंग्रह—काइसं.
कुटुंबशिक्षक—कुशि.
कुंडलीविज्ञान—कुं.
केतकी—के.
केरळकोकिळ—केको.
केरळकोकिळ आणि नवें मन्वंतर—केकोनम.
केरळकोकिळ नूतन—केकोनू.
केसरींतील निवडक निबंध – केनिनि.
केळकरकृत लेखसंग्रह—केकृ.
खरा प्रकार—खप्र.
खेळगडी—खे.
गांधर्वमहाविद्यालय—गांमवि.
गोवर्धन—गोवर्धन.
ग्रंथमाला—ग्रंमा.
घटकाभर करमणूक — घक.
चतुष्पाद आणि कृषिकर्म—चकृ.
चित्ताकर्षण—चि.
चित्रमयजगत्—चिज.
चंद्रिका—चं.
ज्योतिर्माला—ज्योमा.
दैवज्ञ—दैवज्ञ.
दैवज्ञप्रबोधिनी—दैप्र.
दंभहारक—दंहा.
धन्वंतरी—धन्वंतरी.
धर्मजागृति— धजा.
नवयुग—नयु.
नवें मन्वंतर—नम.
नाट्यकथार्णव—नाक.
निबंधमाला—निमा.
निबंधसंग्रह—निसं.
पुणेंपाठशालापत्रक—पुपाशा.
प्रभात (धुळें)—प्र.
प्रभात (मुंबई, खरे)—प्रभात.
प्रभुमासिक—प्रमा.
प्राचीप्रभा — प्राप्र.
प्रेमोद्यान—प्रे.
फलज्योतिषादर्श—फ.
बालबोध—बाबो.
बालांकुर—बालांकुर.
ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला—ब्रग्रंर.
भागिनीसमाचार—भस.
भारत इतिहास संशोधक मंडळ—भाइ.
भारतवर्ष—भाव.
भारतसेवक—भासे.
भिषग्विलास—भि.
भांडारकर यांचीं धर्मपर व्याख्यानें — भांधव्या.
भंडारीमित्र—भंमि.
मकरंद—मकरंद.
मधुकर—मधुकर.
मनोरंजन आणि निबंधचंद्रिका—मानिचं.
मराठा—मराठा.
मराठशालापत्रक—मशा.
मराठीसाहित्यपत्रिका—मसाप.
मराठीशिक्षक—मशि.

मराठीज्ञानप्रसारक—मज्ञा.
महाराष्ट्रकवि—मक.
महाराष्ट्रकोकिल—मको.
महाराष्ट्रग्रंथप्रभा—मग्रं.
महाराष्ट्रमहिला—मम.
महाराष्ट्रवाग्विलास—मवा.
मासिक मनोरंजन—माम.
राजवैद्य—रावै.
रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें--राधव्या.
रामदास आणि रामदासी—राआरा.
राष्ट्रबोध—राबो.
रंगभूमि—रंभू.
लायब्ररी मिसलेनी—लामि.
लोकमित्र—लो.
लोकशिक्षण—लोशि.
वाग्विलास—वाग्विलास.
विद्यार्थी—विद्यार्थी.
विद्यार्थीमित्र—विमि.
विद्याविनोद—विवि.
विविधज्ञानविस्तार—विज्ञा.
विश्ववृत्त—विवृ.
विहार—विहार.
वेदार्थयत्न—वेदार्थयत्न.
वैश्य मासिक—वैमा.
व्यायाम—व्या.
शेतकी आणि शेतकरी—शे.
श्रीकृष्णमाला—श्रीकृमा.
श्रुतिबोध—श्रुतिबोध.
षड्दर्शनचिंतनिका.
सत्यदीपिका—सत्यदी.
सद्धर्मदीप—सदी.
समुद्र—समुद्र.
सरस्वतीमंदिर—सम.
सर्वसंग्रह —ससं.
सुबोधमाला—सुमा.
सुशील—सुशील.
सौभाग्यसंभार अथवा हळदकुंकू—सौअह.
संताचे बोल—संबो.
संकीर्ण लेख (डॉ. केतकर)—संले
संकीर्ण लेख (राजवाडे).—ग्रंथमाला—ग्रंसं
हिंदुधर्मविवेचक—हिंधवि.
ज्ञानदर्पण—ज्ञाद.
ज्ञानदीप—ज्ञादी.
ज्ञानमित्र—ज्ञामि.
ज्ञानसंग्रह—ज्ञासं.
ज्ञानांजन—ज्ञानांजन.

प्रस्तावना.

१. **ज्ञानकोशमंडळाच्या लेखकवर्गास सूचना**:—महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि हा ग्रंथ मुख्यत्वेंकरून लेखकवर्गासाठीं आहे, व यामुळें प्रस्तुत ग्रंथाचा उपयोग लेखकांनीं कसा करावा यासंबंधानें सूचना करीत आहें. त्याचा यथायोग्य अवलंब लेखकांनीं करावा. या सूचना लेखकांचें स्वातंत्र्य कमी करण्यासाठीं केलेल्या नसून केवळ सूचनात्मक आहेत असें समजावें, व त्या काळजीपूर्वक वाचून नंतर लेख लिहावयास लागावें.

मराठींत अमुक विषयावर काय प्रसिद्ध झालें आहे हें प्रत्येक विषयावरील लेखकानें पाहिलें पाहिजे. विषयनिष्णातास विषयाचें अधिक ज्ञान मराठी ग्रंथांच्या अवलोकनानें होईलच असें नाहीं. तथापि त्यास पुढील गोष्टींसंबंधानें ज्ञान होईल. (१) मराठींत वापरलेले पारिभाषिक शब्द कोणते आहेत ? (२) महाराष्ट्रीय जनतेचें लक्ष विशिष्ट विषयाच्या कोणत्या अंगाकडे गेलें आहे ? (३) महाराष्ट्रीय जनतेमध्यें विशिष्ट विषयासंबंधानें ज्ञान व अज्ञान काय आहे ? याशिवाय (४) संस्कृत ग्रंथ व इंग्रजी ग्रंथ यांच्या अभ्यासानें मराठींत ज्ञानमिश्रण व विचारमिश्रण झालें असल्यास तें नजरेस येऊन त्याचा ग्राह्यांश ज्ञानकोशांत राखितां येईल. संस्कृत, प्राकृत, पाली इत्यादि भाषांतील वाङ्मय मराठींत उतरलें तें कोणत्या प्रयोजनामुळें उतरलें, तें उतरतांना फेरफार काय झाले आणि झाले ते कां झाले इत्यादि प्रश्न प्रत्येक वाङ्मयक्षेत्रांत विहार करणाऱ्या विशेषज्ञास उत्पन्न होतात. ज्याप्रमाणें गुन्हेगारानें गुन्हा केल्यानंतर त्याचा शोध करणारा कार्याचे अवशेष आणि व्यक्तिसूचक चिन्हें शोधीत असतो, त्याप्रमाणें जगांतील घडामोडींची वाङ्मयपटलावर दिसून येणारीं चिन्हें शोधून त्या घडामोडींचा तपास लावला पाहिजे, आणि घडामोडी आणि वाङ्मय यांचा अन्योन्याश्रय ओळखला पाहिजे. मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणारास याप्रकारचा परिश्रम महत्त्वाचा आहे.

२. **ग्रंथदोष**—या ग्रंथाचा उपयोग कोणी कसा करावा हें सांगतांनां या ग्रंथांत दोष कोठें झाले आहेत हें सांगणें अत्यंत अवश्य आहे.

या ग्रंथाची रचना कशी झाली, त्यांत कार्यदोष कोठें कोठें झाले त्यांचा हिशोब येणेंप्रमाणें:—

(१) ही यादी प्रत्यक्ष पुस्तकें पाहून तयार झालेली नाहीं. तर इ. स. १८२५ पासून इ. स. १९१४ पर्यंत मुंबई सरकारच्या सरकारी रिपोर्टांवरून डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें जी यादी केली तिच्यावरून बराचसा भाग तयार केला. इ. स. १९१४ नंतरचीं पुस्तकें प्रत्यक्ष सरकारी रिपोर्टांवरून घेतलीं. अर्थात् सोसायटीच्या अथवा सरकारी यादीमध्यें जे दोष नक्कल करतांनां उत्पन्न झाले (त्यांतील बरेचसे शुद्ध केले तथापि सर्वच शुद्ध करतां आले नाहींत) ते कांहीं अंशांनीं राहणारच.

(२) प्रत्येक पुस्तक पाहण्यास उपलब्ध नसल्यानें वर्गीकरणांत चुका झालेल्या असणार. कांहीं पुस्तकांचें नांवांवरूनच वर्गीकरण केलें आहे.

(३) या पुस्तकासारख्या पुस्तकामध्यें साधी छापखानी चूक म्हणजे माहितीची चूक होते. कितीही काळजी घेतली तरी तशा प्रकारच्या चुका झाल्या असतील.

(४) कांहीं पुस्तकांचीं नांवें सरकारी रिपोर्टांत इंग्रजींत असत. त्यांची मूळ नांवें शोधून काढण्याचा प्रयत्न केला. ज्याचें मूळ नांव सबंध उपलब्ध झालें नाहीं तें भाषांतर करून घातलें आहे.

(५) एक पुस्तक दोन ठिकाणीं वर्ग होऊं शकतें; तथापि एक पुस्तक दोन ठिकाणीं न घालतां एकच ठिकाणीं घातलें आहे. त्यामुळें लोकांस अपरिचित अशा सदरांत पुस्तक पडण्याचा संभव आहे.

(६) याशिवाय उणीवी येणेंप्रमाणें:—ब्रिटिश मुंबई इलाख्यांत छापलेल्या पुस्तकांची माहिती मुंबईसरकारच्या ग्याझेटांत असते. मध्यप्रांत, वऱ्हाड, देशी संस्थानें, गोवें इत्यादि ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा अंतर्भाव त्यांत होत नाहीं. मध्यप्रांतांतील पुस्तकांची माहिती इ. स. १८९६ पासूनच उपलब्ध झाली. बडोदें संस्थानापाशीं तेथें

छापून प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची यादी नाहीं. पटवर्धनी संस्थानांकडून याद्या आल्या. कोल्हापूर, निजाम राज्य, सावंतवाडी, इंदूर, बडोदें, गोवें, मद्रास इलाखा इत्यादि ठिकाणच्या पुस्तकांचे सरकारी रिपोर्ट उपलब्ध झाले नाहींत ह्मणून खासगी प्रयत्नानें माहिती मिळविली ती बरीच सदोष व अपूर्ण असणार. वऱ्हाडांत छापून प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचा रेकार्ड वऱ्हाड स्वतंत्र प्रांत होता तोंपर्यंतचा मिळाला नाहीं. शोध करितां असें कळतें कीं वऱ्हाडांत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्या आफिसांत रजिष्टर होत असत. इ. स. १९०३ सालीं वऱ्हाड व मध्यप्रांत यांचें एकीकरण झालें आणि इ. स. १९०५ सालीं वऱ्हाडांतील शिक्षणखात्याचें रेकार्ड मध्यप्रांतीय शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्याकडे पाठविलें गेलें, त्यावेळेस पुस्तकांचें स्थलांतर झालें नाहीं. क्यूरेटरचें ऑफिस इ. स. १९१६ पर्यंत बडनेरा येथें होतें; आणि त्या ऑफिसमध्यें तीं पुस्तकें ठेविलीं होतीं. तथापि त्या पुस्तकांची निगा ठेविली गेली नाहीं. त्यांची यादी तयार केली गेली होती. तथापि इन्स्पेक्टर आफ स्कूल्सच्या निष्काळजीपणामुळें व वरिष्ठ अधिकाऱ्यांस त्या पुस्तकांचें महत्त्व न वाटून, तीं सर्व पुस्तकें जाहिर रीतीनें हरास करण्यांत आलीं. संग्रहालय नाहींसें झाल्यामुळें यादीहि उपलब्ध नाहीं. ही मिळालेली माहिती सर्व खरी असल्यास सरकारास ही गोष्ट विचार करण्याजोगी आहे.

३. वाङ्मयाभ्यासाच्या पद्धतीः—भाषेचा अभ्यास— ग्रंथांचा अभ्यास अनेक तऱ्हांनीं लोक करतात. जर एखाद्या ग्रंथाखेरीज भाषेचे नमुने उपलब्ध नसले तर त्या ग्रंथास भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनें महत्व येतें. भाषेचा अभ्यास साधारणपणें ज्या दोन तऱ्हांनीं करतात त्या तऱ्हा येणें प्रमाणें:—(१) त्या भाषेंतला शब्दसंग्रह तपासणें आणि त्या भाषेंतील शब्दांचा जुन्या भाषेंतील शब्दांशीं, उत्तरकालीन भाषेंतील शब्दांशीं व शेजारच्या भाषेंतील शब्दांशीं संबंध पहाणें व त्यावरून निघणारे नियम शोधणें. या अभ्यासास शब्दशास्त्र म्हणतात. (२) जेव्हां एका भाषेच्या व्याकरणाची दुसऱ्या भाषेच्या व्याकरणाशीं तुलना करून अभ्यास केला जातो व त्या अभ्यासांत सांपडलेल्या नियमांच्या संचयानें जेव्हां शास्त्र बनतें तेव्हां त्यास भाषाशास्त्र ह्मणतात. भाषाशास्त्र बरेंच वृद्धिंगत झालें आहे. तथापि वाङ्मयाभ्यासाचें शास्त्र अजून तयार झालें नाहीं. वाङ्मयाच्या अभ्यासांत शास्त्रीय पद्धति डोकावूं पहात आहे. पण तिचीं तत्त्वें अजून स्थापित झालीं नाहींत. वाङ्मयाभ्यासास शिस्त लावण्याचा प्रयत्न ह्मणून वाङ्मयाभ्यासाचें वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करितों.

४. वाङ्मयाचा अभ्यास—वाङ्मयाचा अभ्यास जो कांहीं चांगल्या तऱ्हेनें होऊं लागला आहे तो येणेंप्रमाणें:—वाङ्मय हें राष्ट्राच्या सामाजिक व राजकीय इतिहासाचें साहित्य समजून तें वाङ्मय ज्या लोकांचें असेल त्यांचीं स्थित्यंतरें कशीं काय झालीं हें पाहणें. संस्कृत वाङ्मयाचा पाश्चात्य पंडित जो अभ्यास करीत आहेत तो जवळ जवळ याच प्रकारचा आहे. उदाहरणार्थ "ब्राह्मणें" नांवाचे ग्रंथ घेतले तर ते कोणत्या परिस्थितींत कोणतें कार्य करण्यासाठीं अवतरले, आणि तत्कालीन सामाजिक अगर राजकीय परिस्थिति त्यांत कशी काय चित्रित झाली आहे, हें कोणी शोधीत बसतील. कोणी वाङ्मयांत व्यक्त झालेल्या विचारांची मूलस्थिति आणि विकास शोधीत बसतील. अनुष्टुभ् छंदाची पूर्वपरंपरा काय इत्यादि गोष्टींच्या अभ्यासांत कोणी गर्क होतील. कोणी, हें वाङ्मय ज्या जातीचें आहे त्या जातीचें न राहतां अनेक जातींचें झाल्यामुळें काय फेरफार झाले हें पहात बसतील. येणेंप्रमाणें अभ्यासाचे चार प्रकार होतात.

(१) **सामाजिक अभ्यास**—याचा अर्थ, समाज आणि वाङ्मय यांचा परस्पर संबंध शोधणें, ह्मणजे कोणत्या प्रकारच्या राजकीय अगर आर्थिक परिस्थितींत कोणत्या प्रकारचे ग्रंथ झाले हें जाणणें; आणि पुढें ग्रंथांचा समाजावर काय परिणाम झाला हें अजमावणें. कोणत्या परिस्थितींत ग्रंथ झाले हें शोधावयाचें ह्मणजे समाजाच्या कोणकोणत्या जरूरी ग्रंथांनीं पूर्ण केल्या हें लक्ष्यांत घ्यावयाचें. समाजाच्या एकंदर आयुष्याचा ग्रंथसंपत्ति हा एक भाग आहे, असें ओळखून वाङ्मय आणि समाज यांतील अवयवावयवी संबंध सविस्तर निर्देशिला पाहिजे. हा अभ्यास विशेषेंकरून अन्योन्याश्रयशोधक होय.

(२) **वाङ्मयांतर्गत बौद्धिक इतिहास**—समाजांतील लोकांपैकीं कांहींचें मन ग्रंथांत व्यक्त होतें सर्व ग्रंथसमूह साकल्यानें घेतला म्हणजे समाजाचा मानसिक इतिहास समजण्यास मदत होते. हा मानसिक इतिहास भावविषयक असो अगर केवळ वैज्ञानिक असो. बहुतकरून दोन्ही तऱ्हेचा इतिहास समाजांतील वाङ्मयांत बऱ्याच अंशीं चित्रित झाला असतो. कोणताही काल घेतला तरी त्यांत दोन प्रकारच्या विचारप्रवाहांचा संगम होत असतो. एका प्रवाहाचा उगम सामाजिक परिस्थितींत होतो आणि दुसऱ्याचा उगम पूर्वकालीन विज्ञानापासून होतो. समाजांतील विचार करणारा वर्ग नियमित असतो आणि त्याचे विचार बऱ्याच अंशीं ग्रंथांत व्यक्त होतात. ते विचार समाजांतील

परिस्थितीशीं संबद्ध असले तरी त्यांचें कुल निराळेंच असतें. त्यांचा निकट संबंध पूर्वकालीन तद्विषयक विचार करणारांशीं असतो. या प्रकारच्या ग्रंथांचा अभ्यास पूर्वकालीन व उत्तरकालीन तत्ववेत्त्यांच्या ग्रंथांशीं ताडून करावयाचा असतो. या दोनही प्रकारच्या विचारप्रवाहांचा अभ्यास केला म्हणजे वाङ्मयसाधनमूलक बौद्धिक इतिहास झाला. केवळ दुसऱ्या प्रकारच्या अभ्यासास वैज्ञानिक इतिहास ह्मणूं. या प्रकारच्या अभ्यासांत विचारांचा व सिद्धांतांचा तत्कालीन समाजाशीं संबंध न शोधतां पूर्वी गेलेल्या व नवीन येणाऱ्या विचारांशीं संबंध शोधावयाचा असतो, जेव्हां अनेक राष्ट्रांचा परस्परांशीं संबंध येतो, तेव्हां दोघांच्या वैज्ञानिक परंपरा एकत्र होत असतात. आर्य ज्योतिषाचा यवन ज्योतिषाशीं संबंध पहाणें हा या अभ्यासाचा भाग झाला.

(३) **बाह्यस्वरूपलक्षी अभ्यास**—हा वाङ्मयाचा तिसऱ्या प्रकारचा अभ्यास होय. वाङ्मय ज्या ज्या स्वरूपांनीं अवतीर्ण होतें तीं स्वरूपें अभ्यासावयाचीं. हा अभ्यासविषय फार जुना आहे. काव्य, निबंध, नाटक इत्यादि जीं वाङ्मयाचीं स्वरूपें दिसतात तीं निर्माण कशीं झालीं, त्यांची वाढ कशी झाली वगैरे. जसा एका काळच्या विचाराचा पुढील व पाठीमागील विचारांशीं संबंध असतो तसा एका काळच्या वाङ्मयस्वरूपाचा पाठीमागील व पुढील काळच्या वाङ्मयस्वरूपाशीं संबंध असतो. ग्रंथ नटविण्याची शैली एक ग्रंथकार काढतो. दुसरा ग्रंथकार त्याचें प्रसंगीं आंधळें, प्रसंगीं भेदयुक्त अनुकरण करतो. याशिवाय दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं वाङ्मयाचा एक आकार दुसऱ्या आकाराचा पूर्वगामी अगर अनुगामी असतो. उदाहरणार्थ सूत्ररूप वाङ्मय निर्माण झाल्यानंतर वृत्तिरूप वाङ्मय निर्माण होतें; निरनिराळ्या दर्शनांचें मूळ ग्रंथ उत्पन्न झाले ह्मणजे नंतर वादग्रंथ उत्पन्न होतात; वगैरे.

(४) **मानववंशशास्त्रात्मक अभ्यास**—हा अभ्यासाचा चौथा प्रकार होय. वर सांगितलेले तीन प्रकार एका राष्ट्राच्या वाङ्मयास इतर वाङ्मयांचा स्पर्श न होतांही संभवतात. एकाद्या जातीचें अगर राष्ट्राचें वाङ्मय (त्या जातीच्या अगर राष्ट्राच्या) निरनिराळ्या अवस्थांमध्यें, आणि त्या राष्ट्राच्या अंतस्थ जीवनकलहामध्यें स्वयंस्फूर्तीनें निर्माण झालेलें असेल. तसेंच तें त्या राष्ट्रांतच उत्पन्न होणाऱ्या आणि लय पावणाऱ्या विचारांचें निदर्शक असेल. तथापि एका समाजाच्या आंतल्या खळबळींच्या अभ्यासाहून भिन्न असा अभ्यास म्हणजे अनेक जातींचें घर्षण होऊन निराळी संस्कृति बनली असतां सांस्कृतिक व वाङ्मयविषयक अवशेषांवरून मूलस्थिति शोधणें, किंवा जें वाङ्मय एका जातीचें होतें तें अनेक जातींचें कसें झालें हें पहात बसणें. दोन्ही तऱ्हेच्या अभ्यासाचीं उदाहरणें आहेतच. अवशेषांवरून मूलस्थिति शोधण्याचा प्रयत्न दाखविणारें इंग्रजी लोकप्रिय पुस्तक म्हणजे Ethnology in Folklore, by, Gomme हें होय. नुकताच चित्रमयजगतांत रा. छत्रे यांनीं तशाच प्रकारचा प्रयत्न केला होता. " अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं " इत्यादि प्रचारांतील वाक्यें घेऊन हीं कानडी संस्कृतींतून मराठी संस्कृतींत शिरलीं आहेत हें दाखविलें होतें. या प्रकारचा अभ्यास म्हणजे मानववंशशास्त्रात्मक होय.

वर केलेलें विवेचन आणि सांगितलेले अभ्यासाचे चार प्रकार, हीं वाङ्मयाभ्यासांत गर्क होऊं पहाणारांसाठीं आहेत. तथापि वाङ्मयाच्या वृद्धिक्षयविकासाचा विचार सर्वांनांच असला पाहिजे, तर त्याविषयीं थोडेसें विवेचन करितों.

५. **वाङ्मयाच्या हिताहिताच्या दृष्टीनें समाजाचें अवलोकन**—हें करावयाचें म्हणजे मुख्यत्वें-करून खालील गोष्टींचा विचार केला पाहिजे. कां कीं त्या सर्वांचा वाङ्मयाच्या उत्कर्षापकर्षाशीं निकट संबंध आहे.

(१) ज्या भाषेची व भाषेंतील वाङ्मयाची आपण कळकळ बाळगतों ती भाषा अगर ती भाषा बोलणारा आजचा समाज वाढत आहे अगर कमी होत आहे.

(२) भाषेची परिचितता आज भाषा बोलणाऱ्या लोकांवर कमी होऊन इतर भाषांची परिचितता वाढत आहे काय ?

(३) ज्या परक्या संस्कृतीमुळें स्वकीय भाषेपेक्षां परकीय भाषा लोकांस जवळची होईल अशा परक्या संस्कृतींचें अगर त्या संस्कृतींस पोटाशीं धरणाऱ्या संप्रदायांचें महत्व वाढत आहे काय ? परकीय संस्कृतींत जन्म पावलेले विचारसंप्रदाय अगर पारमार्थिक संप्रदाय परक्या भाषेशीं निगडित झाले आहेत काय ?

(४) समाजांत साक्षरता उत्पन्न झाल्यानें समाजाच्या भाषेस एकरूपता येते आणि प्रांतिक भेद कमी होत जातात, व त्या भाषेंतील वाङ्मयाचा विस्तार होतो. यासाठीं समाजांत साक्षरता कितपत आहे हेंही पाहिलें पाहिजे.

(५) भाषेची पोटभाषा स्वतंत्र होऊं पहात आहे कीं मूलभाषेशीं तन्मय होऊं पहात आहे ?

(६) समाजांतील संस्कृतीच्या दृष्टीनें जो उच्च वर्ग आहे त्याचें महत्व सामान्य जनतेमध्यें कमी होत आहे काय ?

(७) देशांतील लोकांचें बाहेर देशीं प्रयाण कसें होत आहे ? (बाहेर जाणारे लोक) आपल्या संस्कृतीस जतन करणाऱ्या संस्था म्हणजे, संस्कार करणारे भिक्षुक, प्रवचनें करणारे व्याख्याते, भाषाशिक्षक, भाषालेखक व त्या भाषेंत लेख वगैरे प्रसिद्ध करणारे छापखाने वगैरे घेऊन जात आहेत अगर त्या शिवाय जात आहेत.

(८) परक्या ठिकाणाहून येणारे लोक देश्य भाषेशीं आणि संस्कृतीशीं संलग्न होत आहेत अगर देश्य संस्कृतीस दुर्बल करीत आहेत. ते देश्य मंडळीशीं लग्नव्यवहार करून मिसळतात कीं नाहीं ?

या प्रत्येक गोष्टीचा विचार करून भाषेचें, ती भाषा बोलणाऱ्या लोकांचें, आणि त्या भाषेंतील वाङ्मयाचें हिताहित पाहिलें पाहिजे. समाजाची सुस्थिति हें वाङ्मयोत्कर्षाचें साधारण कारण होय. तर समाजाचा वृद्धिक्षय, दार्ढ्य, साक्षरता आणि उपयोगी स्थलांतर या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

६. **महाराष्ट्रीय वाङ्मयाच्या वृद्धिक्षयाचीं सामान्य कारणें**—महाराष्ट्रीयांचें हिंदुत्व कायम राहणें आणि महाराष्ट्रीयांची संख्या जननापेक्षां मृत्यु कमी या नियमानें वाढणें या दोन पद्धतींनीं महाराष्ट्र राहील व वाढेल. मराठी भाषेचें राष्ट्रशासनांत महत्व वाढल्यास भाषेच्या व वाङ्मयाच्या संवर्धनास अधिक मदत होईल; आणि महाराष्ट्रांत आलेल्या परक्यांवर महाराष्ट्रीयत्वाचीं पुटें चढतील. महाराष्ट्रांत साक्षरता झाल्यास समाजाच्या सांघिक बलवृद्धीस मदत होऊन कार्यक्षमता अधिक उत्पन्न होईल आणि वाङ्मयाचा ग्राहकवर्गहि वाढेल, आणि पोटभाषांचें बल कमी होऊन सर्वसामान्य भाषा वाढेल. तसेंच महाराष्ट्रीयांचें स्थलांतर महाराष्ट्रांतील कमी वसलेला भाग वसविण्याकरितां झालें, किंवा मराठीची पोटभाषा जेथें आहे तेथें झालें, किंवा वाङ्मयविहीन अशी भाषा बोलणारांच्या नजीकच्या देशांत झालें तर तें महाराष्ट्राच्या विस्तारास आणि दार्ढ्यास कारण होईल.

समाजांतील दार्ढ्य हें दोन प्रकारचें आहे. एक तर एकाद्या प्रदेशांतील एकंदर लोकसंख्येमध्यें महाराष्ट्रीयांचें बल ह्मणजे प्रमाण काय आहे हें पाहून ठरवावयाचें. यास **स्थूलदार्ढ्य** म्हणू. दुसरें दार्ढ्य ह्मटलें म्हणजे "**घटनादार्ढ्य**." हें त्या ठिकाणीं असलेल्या समाजाच्या अंतर्गत समूहांत 'अवयव' आणि 'अवयवी' संबंध किती आहे हें पाहून ठरवावयाचें. आणि महाराष्ट्रीय समाजाच्या प्रमुखामध्यें व इतर जनतेमध्यें जो संबंध आहे तोच त्या मुख्यांत आणि तद्देशस्थ इतरे जनांत उत्पन्न झाला ह्मणजे तें दार्ढ्य अधिक वाढलें असें समजावें.

आज आपणांस स्थूलदार्ढ्य किती आहे हें आंकड्यांनीं सांगतां येईल. घटनादार्ढ्य हें आंकड्यांनीं वर्णन करितां येत नाहीं. हें दार्ढ्य सांगण्यापूर्वी महाराष्ट्रीय समाजाची मोजदाद प्रथम केली पाहिजे.

७. **महाराष्ट्रीय समाजाची मोजदाद**—मराठी भाषा बोलणारे लोक आज एक कोटि अठ्याण्णव लक्षांवर ह्मणजे जवळ जवळ दोन कोट आहेत. इ. स. १९०१ मध्यें महाराष्ट्रीयांची संख्या एक कोटि ब्यायशीं लक्ष अडतीस हजार होती. ह्मणजे महाराष्ट्रीय समाजाची संख्येनें वाढ पंधरा लक्षांपेक्षां अधिक झाली आहे. आजच्या महाराष्ट्रीय वस्तीचें स्थलवार पृथक्करण येणें प्रमाणें:—

हिंदुस्थानची खानेसुमारी. सन १९११.

भाषा—मराठी.

प्रांत.	लोकसंख्या.		
	एकूण.	पुरुष.	स्त्रिया.
मुंबई	९०,१६,२२८	४५,५१,७२६	४४,६४,५०२
मध्यप्रांत आणि वऱ्हाड	४८,६५,९८०	२४,२७,५१०	२४,३८,४७०
हैदराबाद संस्थान	३४,९८,७५१	१७,६३,९९७	१७,३४,७५४
मुंबई इलाख्यांतील संस्थानें	१७,२५,८१२	८,६५,४४५	८,६०,३६७
मद्रास	२,९८,९९८	१,५०,३४६	१,४८,६५२
मध्यप्रांतांतील संस्थानें	१,४६,११९	७३,४४४	७२,६७५
म्हैसूर संस्थान	८७,४७६	४६,७५५	४०,७२१
मध्य हिंदुस्थान	६५,९१३	३२,०७६	३३,८३७
मद्रास इलाख्यांतील संस्थानें (कोचीन त्रावणकोरसह) ...	४१,८६९	२२,०१८	१९,८५१
बडोदें संस्थान	३६,१४५	१९,४८३	१६,६६२
* कोचीन	२२,२२५	११,५४४	१०,६८१
* त्रावणकोर	१७,८२०	९,५६१	८,२५९
संयुक्तप्रांत	६,०२९	३,४७८	२,५५१
कूर्ग	४,४३७	२,६३३	१,८०४
बंगाल	२,४०३	१,४७८	९२५
ब्रम्हदेश	२,२१२	१,८०६	४०६
राजपुताना	२,०२८	१,१०५	९२३
आसाम	१,३९६	८६५	५३१
बिहार आणि ओरिसा	१,०४९	५६०	४८९
बलुचिस्थान	७८६	६९३	९३
पंजाब	७५६	५०७	२४९
अजमीर–मेरवाडा	६८८	३७२	३१६
अंदमान आणि निकोबार	६७१	६६२	९
बिहार आणि ओरिसा संस्थानें	२८४	१६४	१२०
सिकिम संस्थान	२२२	२२२	०
वायव्येकडील प्रांत	२१९	२०४	१५
दुसरे प्रांत	१६५	१४०	२५
एकुण ...	१,९८,०६,६३६ †	९९,६७,६८९	९८,३८,९४७

* कोचीन व त्रावणकोर यांचे आंकडे बेरजेंत घेतले नाहींत.

† हे आंकडे १९११ च्या खानेसुमारीवरून घेतले आहेत. ही मराठी बोलणारांची संख्या ४०१६ नीं चुकली आहे. म्हणजे खरी मराठी बोलणारांची संख्या १९८०२६२० इतकीच आहे. सिंघाली आणि महल या मराठीच्या पोट-भाषा धरून त्यांचे आंकडे अनुक्रमें ३४१ व ३६७५ हे यांत घातले आहेत. सिंघाली ही सिलोनची भाषा आहे व महल ही मिनिकाय बेटाची भाषा आहे. हें बेट त्रिवेंद्रमशीं समांतर आहे. व लखदीव व मालदीव यांच्यामध्यें आहे.

वरील कोष्टकामध्यें दिसून येणाऱ्या कांहीं ठळक गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. पहिली लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हटली ह्मणजे मराठी भाषा बोलणारे लोक एकंदर एक कोटि अठ्याणव लक्ष ह्मणजे सुमारें दोन कोटि आहेत. आणि यांपैकीं फक्त शेंकडा ४५ लोक मुंबई इलाख्यांत आहेत. शेंकडा साडेचोवीस लोक मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून आहेत व शेंकडा अठरा लोक निजामच्या राज्यांत आहेत; व सुमारें शेंकडा बारा लोक इतरत्र आहेत. या आंकड्यांमध्यें पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील मुलखांतील लोकवस्ती गणिली नाहीं.

वर सांगितलेले तीन मुख्य प्रदेश सोडून दिले तरी इतर मुलुखांत दिसणाऱ्या देखील कांहीं गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. उदाहरणार्थ बडोदें हें संस्थान मराठी आहे आणि ह्मैसूर तसें नाहीं. तरी देखील म्हैसूर संस्थानांत बडोदे संस्थानाच्या दुपटीनें मराठी बोलणारे लोक आहेत. मध्यहिंदुस्थानांत ग्वाल्हेर, इंदूर, देवास, धार इत्यादि संस्थानें मराठी असून देखील त्यांत असणाऱ्या महाराष्ट्रीय लोकांची संख्या एकत्र केली तरी ह्मैसूर संस्थानांतील महाराष्ट्रीय जनतेच्या संख्येच्या तीन चतुर्थांश भरते. एवंच जेथें आज मराठी राज्य आहे तेथें महाराष्ट्रीयांच्या जीवनास अधिक क्षेत्र आहे असें ह्मणतां येणार नाहीं.

८. **महाराष्ट्राचें दार्ढ्य**—छोटीं संस्थानें सोडून दिलीं असतां असें म्हणतां येईल कीं जेथील जनता महाराष्ट्रीय आहे तेथील राज्य मराठी नाहीं, व जेथें मराठी राज्य आहे तेथील शासित लोक परके आहेत. कोल्हापूर व पटवर्धनी संस्थानें येथें देखील कानडी भाषा बोलणारांचा भरणा मोठा आहे. या गोष्टींमुळें महाराष्ट्रीय जनतेचें अगर संस्कृतीचें दार्ढ्य साध्य होत नाहीं. एक भाषा बोलणारे लोक एकत्र असतां त्यांच्यामध्यें एकत्वभाव आणि परस्परावलंबित्व कायम ठेवणें आणि वाढविणें, शिवाय तेथें परके लोक आले असतां त्यांचा स्थानिक जनतेशीं अवयव आणि अवयवी असा संबंध प्रस्थापन करणें हें जें महत्वाचें कार्य आहे तें कार्य पार पाडण्यासाठीं, अनेक साधनें स्वतंत्र देशांत उपलब्ध आहेत. त्यांतील मुख्य साधन म्हटलें म्हणजे देश्य भाषेचा लोकशासनासाठीं होणारा उपयोग हें होय. आज त्या बाबतींत साहाय्य फारसें नाहीं. तालुक्यांच्या ऑफिसांमध्यें बराचसा व्यवहार मराठींतच चालू असल्यामुळें त्या बाबतींत थोडेंसें एकत्व आहे. देशांत मोठमोठे कारखाने निघाले म्हणजे त्याच्या योगानें समाजाची घटना राहतेच असें नाहीं. परक्या ठिकाणचे कामकरी तेथें येतील व भांडवलवालेही तेथें येतील, तथापि तेवढ्यामुळें समाजाला एकत्व येत नाहीं. परके आलेले लोक स्थानिक भाषा बोलूं लागले, देश्य ब्राह्मण त्यांचे गुरु झाले तर समाजाला एकरूपता येऊं लागते; व समाजामध्यें परस्परावलंबित्व व एकभावत्व रुजूं लागतात. समाजामध्यें भाषेचें महत्त्व वाढविण्यास धर्मोपदेशक, नाटकमंडळ्या, मनोरंजक पुस्तकें वगैरे समाजास एकत्व आणण्यास कारणीभूत होतात. सध्यांच्या स्थितीचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हटलें म्हणजे महाराष्ट्रांत घटनादार्ढ्य जवळजवळ मुळींच नाहीं.

९. **स्थूलदार्ढ्य**—आतां स्थूल दार्ढ्याचा विचार करूं. महाराष्ट्र याची व्याख्या आपण आतां अशी करतों कीं जेथें मराठी भाषा प्रामुख्यानें चालते तें महाराष्ट्र. महाराष्ट्र या दृष्टीनें पाहतां कोंकणापासून वाईनगंगेपर्यंत पसरलें आहे. महाराष्ट्राची गुजराथेशीं तुलना करितां आपणांस असें आढळून येईल कीं मराठी भाषेनें बळकावलेला प्रांत मोठा आहे आणि त्यामुळें महाराष्ट्रांत मराठी भाषेचें दार्ढ्य कमी आहे. महाराष्ट्रांत मराठी बोलणाऱ्यांचें प्रमाण गुजराथेंत गुजराथी बोलणारांपेक्षां व बंगालमध्यें बंगाली बोलणाऱ्यांपेक्षां पुष्कळ कमी आहे. गुजराथेंत गुजराथी बोलणारांचें प्रमाण दर हजारीं ९२० आहे, बंगालमध्यें बंगाली बोलणारांचें प्रमाण ९१० आहे; परंतु सरसकट महाराष्ट्र घेतला तर एकंदर लोकसंख्येंत मराठी बोलणारांचें प्रमाण ८५० देखील निघणार नाहीं. कोंकणांत तें बरेंच आहे. कोंकणामध्यें उत्तर कानडाचा अंतर्भाव केल्यामुळें एकंदर कोंकणांत कमी प्रमाण दिसतें तथापि रत्नागिरी, कुलाबा या दोन जिल्ह्यांत दर हजारीं २५ लोकांहून कमी इतर भाषांचें प्रमाण आहे. मराठी भाषेच्या दार्ढ्याप्रमाणें जिल्ह्यांची नंबरवारी येणें प्रमाणें आहे :—(१) रत्नागिरी (२) कुलाबा (३) सातारा (४) पुणें (५) अहमदनगर (६) नाशिक (७) ठाणें (८) बुलठाणें (९) अकोला (१०) पूर्व खानदेश (११) सोलापूर (१२) वर्धा (१३) नागपूर (१४) उमरावती (१५) भंडारा (१६) चांदा (१७) यवतमाळ (१८) पश्चिम खानदेश (१९) मुंबई शहर.

यांपैकीं पहिल्या चार जिल्ह्यांत शेंकडा ९० हून अधिक लोक मराठी बोलतात. पुढील सात जिल्ह्यांत शेंकडा ८० हून अधिक लोक मराठी बोलतात. त्यापुढील पांच जिल्ह्यांत शेंकडा ७० हून अधिक लोक मराठी बोलतात.

यवतमाळ जिल्ह्यांत शेंकडा ६० हून अधिक मराठीचें बल आहे. पश्चिम खानदेश व मुंबई येथें मराठी भाषेचें बल निम्म्याहून अधिक आहे पण शेंकडा ६० देखील नाहीं.

आंता शेंकडा पन्नासहून कमी तथापि महाराष्ट्रीय भाषा जेथें बरीच आहे असा भाग पाहिला असतां नंबरवारी लागते ती येणें प्रमाणें. उत्तर कानडा शेंकडा ३८; बेळगांव शेंकडा २४. मध्यप्रांतांतील घाटमाथा म्हणजे बैतुल, छिंदवाडा, शिवणी, मंडला जिल्हे येथें शेंकडा १३ हें प्रमाण निघतें. हीं विधानें पुढील कोष्टकांवरून स्पष्ट होतील.

मुंबई इलाख्यांतील निरनिराळ्या भागांत प्रत्येक भाषेचें दार्ढ्य.

जिल्हा आणि भाग.	दर दहा हजारीं.											
	बलुची	भिल्ली	ब्राहुई	गुजराथी	कच्छी	कानडी	मराठी	राजस्थानी	सिंधी	सिरकी	पाश्चात्य हिंदी	इतर
मुंबई शहर ...	...	...	...	२०९७	४१४	...	५३६६	९४	...	...	१४८३	५४६
गुजराथ ...	...	२४९	...	९२०५	५	...	...	५९	..	...	३२१	१६१
कोंकण ...	...	...	...	...	...	७७६	८६२५	...	...	...	२५६	३४३
कानडा ...	...	...	...	...	...	५५८८	३८३६	...	...	...	४७०	१०६
कुलाबा ...	...	...	...	...	...	३	९७८८	...	...	...	१०१	१०८
रत्नागिरी ...	...	...	...	...	...	३	९७७४	...	...	...	२१४	९
ठाणें ...	...	...	...	...	...	३	८६११	...	...	...	३१५	१०७१
दक्षिण (डेक्कन) ...	...	३५९	..	...	...	...	८५६२	...	...	...	६०१	४७८
अहमदनगर ...	...	१२९	...	...	...	...	८९३३	...	...	...	५२५	४१३
पूर्व खानदेश ...	...	२९३	...	...	...	...	८२४५	...	...	...	१०२५	४३७
पश्चिम खानदेश ...	...	२९०६	...	...	...	...	५६८७	...	...	...	५८२	८२५
नाशिक ...	...	१९६	...	...	...	...	८९३०	...	...	...	५९९	२७५
पुणें ...	...	...	...	...	...	...	९०६१	...	...	...	४९१	४४८
सातारा ...	...	...	...	...	...	...	९५०८	...	...	...	२८४	२०८
सोलापूर ..	...	...	...	...	...	...	८२४२	...	...	...	७४१	१०१६
कर्नाटक ...	...	...	...	...	...	७६०५	१०८६	...	...	...	...	१३०९
बेळगांव ...	...	...	...	...	...	६५७१	२४९१	...	...	...	...	९३८
विजापूर ...	...	...	...	...	...	८१७५	३६५	...	...	...	...	१४६०
धारवाड ...	...	...	...	...	...	८०७६	४०१	...	...	...	...	१५२३
सिंध ...	५५३	...	८२	...	९९	...	...	...	८१०५	४६२	...	६९९

मध्यप्रांतांतील निरनिराळ्या भागांत प्रत्येक भाषेचें दार्ढ्य.

जिल्हा आणि भाग.	दर दहा हजारीं.									
	हिंदी	मराठी	उडीया	गोंडी	कुरख	तेलगु	कोर्कु	बंजारी	इंग्लिश	इतर
नर्मदा विभाग ...	९२९१	२१९	१	१२४	...	५	१५१	४७	२१	१४१
घाटमाथा ...	५७४५	१२७५	...	२६३१	...	९	२९४	२१	२	२३
मराठी मैदान ...	१४४९	७३९४	१	६४६	...	१९५	६८	१२६	७	११४
वर्धा ...	१००७	७८९८	...	९४४	...	४३	...	३२	१	७४
नागपूर ...	१३२६	७८६१	१	५८२	...	९२	...	२३	४१	७४
चांदा ...	३९९	७१७७	३	१३७०	...	९६०	...	१६	१	७४
बालाघाट ...	५८४५	२५४८	१	१५३९	...	३४	३	८	२	२०
उमरावती ...	१४६९	७६६५	...	२३७	...	३४	४७४	१९	४	९८
अकोला ...	१२६५	८३३२	...	२९	...	५०	१	२०७	१	११५
बुलठाणें ...	११७४	८५३६	...	११	..	४८	८	६७	१	१५५
यवतमाळ ...	७६२	६९२६	...	८३७	...	४०४	...	९६८	१	३७२
भंडारा ...	१५९५	७४१५	१	९१३	...	६४	...	...	२	१०
छत्तिसगड मैदान भाग ...	८२४९	३७७	६३६	६२०	२२	३८	...	३३	२	२३
छोटा नागपूर भाग ...	८३६०	१	१२७	१	१२४२	...	...	२	...	२६७

१०. **हिंदुस्थानांत महाराष्ट्रीयांचें महत्व**—महाराष्ट्रभाषा बोलणारे लोक गेल्या दहा वर्षांत पंधरा लक्षांहून अधिक संख्येनें वाढले पण त्यांचें दार्ढ्य आणि हिंदुस्थानांत महत्त्व राहण्यासाठीं आणखी एका गोष्टीकडे पाहिलें पाहिजे. एकंदर जनतेमध्यें महाराष्ट्रीयांचें प्रमाण काय आहे, तें वाढत आहे अगर कमी होत आहे याचा विचार केला पाहिजे. निरनिराळ्या भाषांचें वृद्धिक्षयाचें प्रमाण येणेंप्रमाणें आहे.

प्रत्येक भाषा बोलणाराचें वृद्धिक्षयदर्शक कोष्टक. आंकडे हजाराचे आहेत

(सर्व हिंदुस्थानांकरितां).

भाषा.	१९११		१९०१		एकूण.		दर हजारीं बाढीचें प्रमाण. १९०१ पासून. १९११ पर्यंत.
	पुरुष.	स्त्रिया.	पुरुष.	स्त्रिया.	१९११	१९०१	
तेलुगु ...	१२०९६	१२००१	१०६८८	१०५०३	२४०९७	२११९१	१३७
बंगाली ...	२४५३८	२३८२९	२२५१२	२२११२	४८३६७	४४६२४	८३
मराठी ...	९९६८	९८३९	९१४८	९०९०	१९८०७	१८२३८	८६
गुजराथी ...	५५१८	५१६४	५१०३	४८२५	१०६८२	९९२८	७५
कानडी ...	५२८०	५२४६	५२०१	५१६४	१०५२६	१०३६५	२५

या कोष्टकावरून दिसून येईल कीं मराठी गुजराथी आणि कानडी या तीन लगतच्या भाषांमध्यें मराठी भाषेचा विस्तार अधिक होत आहे. तेलुगु भाषा बोलणारे मात्र महाराष्ट्रीयांपेक्षां अधिक वाढले आहेत. एकंदर हिंदुस्थानांत १९०१ साली लोकवस्ती एकोणतीस कोटी त्रेचाळीस लक्ष होती ती एकतीस कोटी एकावन्न लक्ष झाली; व मराठी बोलणारांची संख्या एक कोटी ब्यायशीं लक्ष होती ती एक कोटी अठ्याण्णव लक्ष झाली. म्हणजे महाराष्ट्रीयांचें भारतीयांत प्रमाण दर दहा हजारांत ६१९ होतें तें ६२८ झालें.

हिंदी भाषेच्या विस्तारसंकोचाचे आंकडे वरील कोष्टकांत दिले नाहींत. याचें कारण एवढेंच कीं हिंदी या शब्दाच्या अर्थास अनेक हेलकावे मिळाले असून खरोखर हिंदी भाषा म्हणजे काय याविषयींच्या मतांत बदल झाल्यामुळें खानेसुमारीच्या रिपोर्टांत हिंदी बोलणाऱ्यांच्या आंकड्याविषयीं अनिश्चितपणा उत्पन्न झाला आहे.

सर्व हिंदुस्थानांत मराठी बोलणारांचें प्रमाण दर दहा हजारांत नवांनीं वाढलें ही गोष्ट महाराष्ट्रास अभिनंदनीय आहे. आतां हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत मराठी भाषेची स्थिति कशी काय आहे हें पाहिलें पाहिजे. आपणांस प्रत्येक भागाचा अभ्यास करून आपलें बल कोठें कमी आहे, कोठें वाढत आहे हें समजलें तर बरें.

११. **मुंबई इलाख्यांत मराठी भाषेची स्थितिः**—मुंबई इलाख्यांतील आंकडे येणेंप्रमाणें आहेत.
(१९०१ व १९११ सालचे आंकडे हजारांचे आहेत)

भाषा	१९०१	१९११	वाढीचें प्रमाण	१९०१ मध्यें दर हजारीं. (भाषा बोलणारांचे)	१९११ मध्यें दर हजारीं. (भाषा बोलणारांचे)
मराठी ...	१०३४०	१०७४२	३९	४०६	३९७
गुजराथी ...	६६६७	७२०९	८२	२६२	२६६
सिंधी ...	३४१०	३४९७	२५	१३४	१२९
कानडी ...	३०९७	३०१२	—२७	१२१	१११

या कोष्टकावरून असें दिसून येत आहे कीं, मराठी बोलणारांची संख्या मुंबई इलाख्यांत जरी वाढली व मराठी बोलणारांचें प्रमाण हिंदुस्थानच्या एकंदर लोकवस्तींत जरी वाढलें तरी मुंबई इलाख्यांत तें प्रमाण कमीच झालें आहे.

मराठी भाषेचा विस्तार होत आहे किंवा नाहीं याविषयीं विचार करतांना ही भाषा बोलणाऱ्या प्रांतांच्या सरहद्दी अवलोकन करून जो काय निर्णय काढावयाचा तो काढला पाहिजे. महाराष्ट्राच्या सरहद्दीवरील भाषा येणेंप्रमाणें:—

गुजराथी—पश्चिमेस व वायव्येस आहे.

हिंदी—ही उत्तरेस व पूर्वेकडे आहे.

गोंडी—ही पूर्व सरहद्दीच्या भोंवताली आहे.

तेलुगु—त्रिकोणी महाराष्ट्राच्या आग्नेयीच्या रेषेवर सुरू होते व संपते. दक्षिण वऱ्हाड व चांदा यांत तिचें अस्तित्व आहे.

कानडी—महाराष्ट्राच्या दक्षिण भागांत आहे.

गुजराथी भाषेचें महाराष्ट्रांत महत्त्व कसें वाढत आहे हें मुंबई शहराकडे दृष्टि फेंकणाऱ्यास सहज लक्षांत येईल. महाराष्ट्र वाढत असलें तर तें गुजराथेच्या सरहद्दीवर खास नाहीं. पश्चिम खानदेशांत शेंकडा २९ गुजराथी बोलणारे आहेत आणि मराठी बोलणारे शेंकडा ५७ आहेत. पूर्व खानदेशामध्यें गुजराथ्यांचें प्रमाण जरी शेंकडा ३ आहे तरी हिंदी बोलणारांचें प्रमाण शेंकडा १० आहे. एकंदर मुंबई इलाख्यांत गुजराथी बोलणारांचें प्रमाण वाढलें व मराठी बोलणारांचें कमी झालें आहे. मुंबई इलाख्यांत गुजराथीप्रमाणें कानडीशीं संबंध येतो तर कानडी भाषेशीं संबंध आला असतां मराठी

व कानडी यांमध्यें कोणाचा उत्कर्ष व कोणाचा अपकर्ष होत आहे हें आपण पाहूं. १९११ पूर्वीच्या दशकांत तेलुगु बोलणारे दर हजारीं १३७ वाढले, मराठी बोलणारे दर हजारीं ८६ वाढले पण कानडी बोलणारे दर हजारीं २५ वाढले. मुंबई इलाख्यांत तर कानडीचा संकोच होत चाललेला दिसतो. कन्नडांची वाढ न होतां दर हजारीं २७ कमीच झाले आहेत. तथापि यावरून असें समजूं नये कीं कानडी जिल्ह्यांत मराठी बोलणारी मंडळी वाढत आहेत आणि कानडी बोलणारी मंडळी कमी होत आहेत. प्रकार उलट आहे. मराठी जिल्ह्यांत पूर्वीपासूनच कानडी वस्ती फार आहे आणि तीच कमी होत असावी. एक तर तिची भाषा बदलत असावी अगर कन्नड मंडळी कानडी जिल्ह्यांत परत जात असावीत. सोलापूर, बेळगांव, धारवाड, विजापूर या चार जिल्ह्यांपैकीं फक्त सोलापूरमध्यें मराठी बोलणारांचें प्रमाण वाढत असून कन्नडांचें कमी होत आहे व इतर तीन जिल्ह्यांत कन्नड वाढत असून महाराष्ट्रीय कमी होत आहेत हें पुढील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

दर हजार लोकवस्तींत मराठी व कानडी लोकांचें प्रमाण व त्यांत चाळीस वर्षांत होणारा फरक दाखविणारें कोष्टक.

जिल्हा.	१९११.		१९०१.		१८९१.		१८८१.	
	मराठी.	कानडी.	मराठी.	कानडी.	मराठी.	कानडी.	मराठी.	कानडी.
सोलापूर ...	८२४	६३	८२०	७१	८१७	६७	८१०	७१
बेळगांव ...	२४९	६५७	२७१	६५२	२५४	६४७	२६०	६४४
धारवाड ...	४०	८०८	३९	८२३	४६	८१९	५६	८१०
विजापूर ...	३६	८१७	३७	८३५	४०	८१४	३८	८२६

या कोष्टकावरून प्रत्येक जिल्ह्याची भाषाविषयक प्रवृत्ति दिसत आहे. स्थानिक भाषा स्वत्व स्थापन करीत आहे. सोलापूर जिल्ह्यामध्यें मराठी भाषेचें प्राबल्य आहे, तो जिल्हा दिवसानुदिवस अधिक महाराष्ट्रीय होत आहे. बेळगांव, धारवाड व विजापूर येथें मराठी संकोच पावत असून प्रत्येक जिल्ह्याचा कानडीपणा वाढत आहे.

१२. **" वऱ्हाड व मध्यप्रांत " येथें मराठी भाषेची स्थितिः**—आतां मध्यप्रांताकडे वळूं. मध्यप्रांताचे भाषाविषयक आंकडे येणेंप्रमाणें आहेतः—

मध्यप्रांतांत १९०१ व १९११ या सालांतील भाषांचें बल एकंदर व दर हजारीं.

भाषा.	बल (००० गाळून)		१००० जनतेंत प्रमाण.		दशवार्षिक वृद्धिप्रमाण शेंकडा.
	१९०१.	१९११.	१९०१.	१९११.	
हिंदी ...	७४६५	८९०६	५४७	५५५	१९
उडिया ...	२९९	३०३	२२	१९	१
मराठी ...	४४२०	५०१२	३२५	३१३	१३
गोंडी ...	९६९	११६७	८६	७३	२०
तेलुगु ...	१२३	१४१	१०	१	१४

मध्यप्रांतांत मराठीची वाढ तेलुगु, हिंदी व गोंडीपेक्षां कमीच आहे. गोंडीचें प्रमाण वाढलेलें दिसत आहे. याचें कारण मुख्यत्वेंकरून ती भाषा बोलणारांची जात वाढली हें असावें; कां कीं गोंडांची संख्या शेंकडा २३ वाढली व परधानांची शेंकडा २५ वाढली. (Census of India. Vol. X. P. 218). तथापि या खानेसुमारींत वन्य जातींची मूळची भाषा काय आहे याची चौकशी करून ती घालण्याचा प्रयत्न अधिक होता ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

१३. **निजामशाहींतील महाराष्ट्रः**—आतां हैदराबाद संस्थानाकडे वळूं. मराठी भाषा बोलणारांपैकीं सुमारें शेंकडा १८ लोक या संस्थानांत आहेत त्यांच्या वृद्धिक्षयाकडे पाहिलें पाहिजे. गेल्या तीस वर्षांत मराठी बोलणारांची संख्या फक्त शेंकडा ११ या प्रमाणानें वाढली आहे. एवढ्याच अवधींत तेलुगु जवळ जवळ दीडपट वाढली आहे, आणि मुंबई इलाख्यांत संकोच पावणारी कानडी भाषा शेंकडा २७ या प्रमाणांत, व उर्दू शेंकडा २९ या प्रमाणांत वाढली आहे.

निजाम राज्यांत इ. स. १८८१, १८९१, १९०१ व १९११ सालीं
निरनिराळ्या भाषा बोलणारांची संख्या.

भाषा		१८८१.	१८९१	१९०१	१९११
तेलुगु	...	४२६६४७०	५०३१०६९	५१४८०५६	६३६७५७८
मराठी	...	३१४७७४५	३४९३८५८	२८९५८६४	३४९८७५८
कानडी	...	१२३८५१९	१४५१०४६	१५६२०१८	१६८०००५
उर्दु	...	१०३८३०५	११९८३८२	११५८४९०	१३४१६२२

इ. स. १९०१ पासून १९११ पर्यंत मराठी बोलणारांची संख्या शेंकडा २८ वाढली हें वरील कोष्टकावरून दिसून येईल, तथापि आपण जर इ. स. १८९१ पासून १९११ पर्यंतचीं वीस वर्षे घेतलीं तर मराठी भाषा बोलणारांची वाढ मुळींच झाली नाहीं असें ह्मणावें लागेल. इ. स. १८९७-१८९९-१९०० च्या दुष्काळांमुळें महाराष्ट्रीय जनतेचें जें नुकसान झालें आहे तितकें कोणाचेंच झालें नसेल. त्या दुष्काळाचा परिणाम सोसूनहि, कानडी व तेलुगु यांची संख्या वाढलेलीच दिसते. उर्दूची कमी झालेली दिसते. तथापि उर्दू बोलणारांची संख्या खरोखर कितपत वाढली अगर खरोखर कितपत कमी झाली हें सांगणें नेहमीं कठिण आहे. कां कीं उर्दू व हिंदी या दोन भाषांपैकीं एकीच्या नांवावरचा हिशेब दुसरीच्या खात्यावर पडण्याचा संभव आहे.

आतां हैदराबाद संस्थानच्या एकंदर एक कोटि चौतीस लक्षांपैकीं (१३३७४६७६) दर हजार वस्तींत निरनिराळ्या भाषा बोलणारांचें प्रमाण कसें काय होतें हें दाखविणारें कोष्टक देतों.

भाषा बोलणारे		निरनिराळ्या सालीं एक हजार लोकवस्तींत निरनिराळ्या भाषा बोलणारांचें प्रमाण.		
		१८९१	१९०१	१९११
तेलुगु	...	४३०	४६२	४७६
मराठी	...	३०३	२६०	२६१
कानडी	...	१२६	१४०	१२६
उर्दु	...	१०४	१०४	१००

या कोष्टकावरून मराठी किती हटली आहे, कानडी आपली जागा कशी राखून आहे, मराठी कशी हटते आहे, व "मागसलेल्या" तेलुगूंची संख्या कशी वाढत आहे हें दिसून येईल. दर हजार लोकवस्तींत मराठीच्या शेंकडा ४२ प्रमाणानें अधिक तेलुगु होते ते शेंकडा ८१ या प्रमाणानें अधिक झाले.

हैदराबाद संस्थानाच्या खानेसुमारीचा (इ. स. १९११) रिपोर्ट म्हणतो कीं "हैदराबाद संस्थानांत ज्या भागास मराठवाडा म्हणून नांव दिलें जातें त्यांत मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचें संख्याधिक्य नाहीं. या भागांतील

मराठी बोलणारे लोक शेंकडा ५० देखील भरणार नाहींत. हैदराबाद संस्थानांतील मराठी भाषा बोलणारे जिल्हे ह्मटले ह्मणजे औरंगाबाद भागांतील बीड आणि परभणी हे जिल्हे, व गलबुर्गा भागांतील उस्मानाबाद जिल्हा हे होत. बेदरमध्यें कानडी व तेलुगु बोलणाऱ्या लोकांची एकंदर संख्या मराठी भाषा बोलणाऱ्यांपेक्षां अधिक आहे, व नांदेडमध्यें तेलुगु व मराठी लोक समानबलच आहेत. साधारणतः पाहिलें असतां औरंगाबाद विभाग व गुलबुर्गा विभागांतील उस्मानाबाद जिल्हा यांनां मिळून मराठवाडा नांव दिलेलें शोभेल. कारण हल्लींच्या मराठवाड्यांतील भाषा बोलणारांची संख्या जी शेंकडा ५० देखील नाहीं ती या नवीन तऱ्हेनें मराठवाडा बनविला तर त्यांत शेंकडा ८० हूनहि अधिक होईल. इ. स. १९०१ सालीं ज्याला मराठवाडा म्हणत होते तोच भाग बरोबर इ. स. १९११ सालच्या मराठवाड्यांत मोडत नसल्यामुळें, दोन्ही सालच्या खानेसुमारींतील मराठवाड्याच्या मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या आंकड्यांची तुलना बरोबर करितां येत नाहीं. मध्यंतरींच्या दुष्काळामुळें इ. स. १८९१ पेक्षां इ. स. १९०१ सालीं मराठवाड्यांतील मराठी भाषा बोलणारांची संख्या बरीच कमी झाली होती. पुढच्या (१०) वर्षांत जरी ती पुन्हा पूर्वपदावर आली, तरी त्यानंतर झालेली वाढ, दुसऱ्या भाषा बोलणाऱ्या लोकांची जी वाढ झाली, तिच्या तोडीची नसल्यामुळें, एकंदरींत त्यांचें बल कमीच झालें आहे. खुद्द हैदराबाद शहराची लोकसंख्या इ. स. १९०१ सालच्या पुढील दहा वर्षांत वाढली असतां देखील मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या उलट कमीच झाली आहे, हें पुढील आंकड्यांवरून कळून येईल. "

हैदराबाद शहरांतील निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक.

भाषा	१९११	१९०१	१८९१
उर्दू ...	२४४७०९	२१३०९२	१९४९३०
तेलुगु ...	१८५३१८	१६९६८०	१५८८८९
तामिळ ...	१८८८५	१७७१८	१५४२६
मराठी ...	१५६९९	१८५६३	१६५८७
राजस्तानी ...	९५८३	९४८२	आंकडे नाहींत
पश्चिमेकडील हिंदी ...	८२८१	२३६०	८३०३
इंग्रेजी ...	७२१९	६'५६२	७३७८

हैदराबाद शहरांतील लोकवस्तीचें प्रमाण देणाऱ्या आंकड्यांचें अवतरण करण्याचें मुख्य महत्त्व असें आहे कीं, एखादी भाषा बोलणारे लोक संख्येनें कमी असले तरी उच्च स्थानावर असले म्हणजे त्या लोकांच्या भाषेचें महत्त्व वाढतें. राजधानीच्या ठिकाणच्या लोकांचें महत्त्व इतर ठिकाणच्या लोकांपेक्षां समाजांत कमी असतें. एखाद्या वर्गाचें राजधानींतून उच्चाटण झालें किंवा तेथें संख्याबल कमी झालें म्हणजे त्यांची सामाजिक व राजकीय बलाची हानि झाली आहे असें समजावें. गेल्या दहा वर्षांत मराठी भाषा बोलणारांची संख्या निजामशाहींत अधिक झाली असून राजधानींत कमी झाली आहे. त्याअर्थीं ही गोष्ट सामाजिक व राजकीय बलहानीची द्योतक समजावी.

१४. **महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रीय**—मुंबई इलाखा, मध्यप्रांत आणि वऱ्हाड व निजामराज्य यांच्या बाहेरची मराठी लोकवस्ती घेतली तर एकंदर महाराष्ट्रियांत शेंकडा बारा निघेल. ही चोंहींकडे पसरली आहे. त्याविषयीं सामान्य माहिती येणेंप्रमाणें.

म्हैसूरमध्यें इ. स. १८७१ सालीं एकंदर लोकवस्ती दहाहजार धरून प्रत्येक भाषेचें बलाबल व वृद्धिक्षय दाखविणारें कोष्टक.

भाषा.	१८७१	१८८१	१८९१	१९०१	१९११
एकंदर लोकसंख्या	१००००	८२८१	९७७९	१०९५७	११४८५
संस्थानच्या देशी भाषा	...	८२३४	९६२८	१०७८५	११२५९
कानडी	...	६१२३	७२३२	८०००	८२०५
हिंदुस्थानी	...	४५८	४६५	५३२ *	६०४
मराठी	...	१३४	१२९	१५४	१५५
तामीळ	...	२५८	३१५	४४८	४७७
तेलुगु	...	१२६०	१४८७	१६५२	१८१९
इंग्रजी	...	१६	२०	२०	२६

* हिंदी आणि उर्दु बोलणारे ह्यांत मिळवून एकंदर बेरीज करून प्रमाण काढलें आहे.

या कोष्टकावरून काय काढावयाचें हें सांगावयास नको. जें समजावयास पाहिजे तें सर्व आंकड्यांनीं स्पष्ट केलेंच आहे. प्रत्येक ठिकाणीं झपाट्यानें वाढणारी तेलंगी मंडळी येथेंहि कशी झपाट्यानें वाढत आहे हें लक्षांत येईल.

बडोदें राज्यांत इ. स. १९०१ सालीं ३७५७८ इतकी लोकसंख्या होती, ती इ. स. १९११ सालीं ३४८३४ झाली म्हणजे दर हजारीं ७३ या हिशोबानें कमी झाली आहे. आज हजार लोकवस्तींत फक्त १७ लोक मराठी बोलणारे निघतील. बडोदें संस्थानची एकंदर लोकवस्ती वाढली आहे. इ. स. १९०१ सालीं ती १९५२६९२ होती ती इ. स. १९११ सालीं २०३२७९८ इतकी झाली, म्हणजे हजारीं एकेचाळीस प्रमाणानें वाढली. मराठी राज्यांत मराठी बोलणारांची लोकसंख्या कमी झाली ही गोष्ट बडोदें येथील विद्वान महाराजांस विचार करण्याजोगी आहे.

कोचीन संस्थानामध्यें मराठी बोलणारांची संख्या २२२२५ आहे. त्यांपैकीं ८५२२ कोंकणी ब्राह्मण (सारस्वत) आहेत. आणि १२३७१ कुणबी (कुडुमी चेट्टी) आहेत. गोंव्याकडून पोर्तुगीज जुलुमाला कंटाळून सारस्वतांबरोबर हे कुणबी आले. कोचीनमधील सारस्वतांची कोंकणी भाषा अपभ्रष्ट होऊं लागली आहे, आणि कुडुमी चेट्टींची भाषा फारच अपभ्रष्ट होऊन शुद्ध कोंकणी बोलणारांसहि समजण्यास कठीण झाली आहे. कोंकणी ब्राह्मण व्यापार करतात, कुडुमी चेट्टी मोलमजुरी करतात, कांहीं नाविकांचें काम करतात. मराठी व कोंकणी बोलणारांची एकंदर संख्या २०१३३ होती ती २२२२५ झाली. आज कोचीनमध्यें दर हजारीं २४ माणसें मराठी अगर कोंकणी बोलतात.

पंजाबमधील ८१५ मराठी बोलणाऱ्या लोकांपैकीं ५४३ पुरुष व २७२ स्त्रिया होत्या. यांपैकीं २२४ मंडळी अंबाल्यास कांहीं अमृतसर व इतर शहरांच्या ठिकाणीं होती. तथापि बहुतेक मंडळी दरबारच्या कामावर दिल्लीस होती

वायव्य सरहद्दीवरील भागांत २१९ मराठी बोलणारे लोक म्हणून इ. स. १९११ च्या खानेसुमारींत लिहिले गेले. यापैकीं बहुतेक मंडळी त्यावेळेस कोहात जिल्ह्यांत मुंबईची एक पलटण ठेविली होती तींत होते. †

कूर्गमधील मराठी मंडळीचे उपजीविकेचे धंदे म्हटले म्हणजे, छोटीं दुकानें चालविणें, शिंपी काम करणें. याशिवाय कित्येक लोक मळ्यावरील मजूर व गाडीवान म्हणून काम करितात. †

बंगाल सरकार, आसाम, व बहार आणि ओरिसा येथील सरकारच्या आफिसांत तेथील मराठी लोकांच्या उद्योगधंद्यासंबंधानें माहिती नाहीं.

इ. स. १९११ मध्यें ११४ मराठी पलटणीची एक तुकडी गंगटोक येथें ठेविली होती. ती सध्यां तेथें नाहीं. सध्यां मराठी बोलणारी मंडळी सिक्किम संस्थानांत नाहींत. †

संयुक्त प्रांतांतील ६०२९ महाराष्ट्रीयांपैकीं २६०० वस्ती काशीक्षेत्रीं आहे, १६५८ झांशी येथें आहे, शिवाय प्रयाग ३२८, कानपूर ४३५, बिजनोर १४७, मथुरा १२८, आग्रा १२३. यांमध्यें क्षेत्रीं राहणें, शिक्षण व रेलवे नोकरी व जुना जमीनदारवर्ग या चार प्रयोजनामुळें मंडळी जमली आहेत.

मध्य हिंदुस्थानांत मराठ्यांची संख्या २८००८ इतकी आहे. त्यांपैकीं १३३५८ लोक काम करणारे आहेत आणि १४६५० इतकी मंडळी त्यांवर अवलंबून राहणारी आहे. यांपैकीं लष्करी वगैरे कामावर सुमारें ५४०० आहेत व २९०० शेतावर मजूरी करणारे आहेत, ४६ मंडळी केवळ उत्पन्नावर राहणारी आहेत आणि १३०० इतर शेतकरी आहेत. (Table XVI Census of India 1911 XVII पहा).

इतर ठिकाणांसंबंधानें विशेष लिहिण्याजोगें नाहीं.

† सरकारी अधिकाऱ्यांडून पत्रव्यवहारानें आलेली माहिती.

१५. **मराठी भाषेच्या परिचिततेचा क्षय**—मराठी भाषा बोलणारांच्या वृद्धिक्षयासंबंधानें विचार झालाच आहे. आतां भाषेविषयीं परिचितता लोकांवर कमी होत आहे काय ? या प्रश्नावर थोडक्यांत निरूपण येणेंप्रमाणें. जे मराठी भाषेच्या पोटभाषा बोलणारे आहेत त्यांजवर मराठी भाषेचें वजन नाहीं. कोंकणी बोलणारे लोक आहेत त्यांपैकीं सुशिक्षित लोक कानडी शिकतात व त्यांच्या बायका मराठी थोडेंबहुत शिकतात. कोंकणांतील मुसलमान मराठी बोलतात पण सुशिक्षित मुसलमान उर्दू शिकतात. गोवानीज ख्रिस्ती मंडळी मराठी शिकण्याची तसदी घेत नाहींत. त्यांची लिपि रोमन होऊन व पोर्तुगीज शब्द मिसळून निराळीच भाषा तयार झाली आहे. हैदराबादकडील मराठी निराळें होऊं पहात आहे. तेथील लोकांवर उर्दूचें दडपण पडत असल्यामुळें त्यांची भाषा बाहेरच्यांस व बाहेरची लिहिण्याची भाषा त्यांस समजेनाशी होऊं पहात आहे. मराठी भाषेंत हैदराबाद संस्थानांत ग्रंथ फारसे होत नाहींत; व त्यामुळें लेखनाची मराठी भाषा मोंगलाईंत सुशिक्षितांत हि चांगलीशी परिचित नाहीं. म्हैसूरकडील महाराष्ट्रीय लोक स्वभाषेपासून च्युत झाले नसले तरी आपल्या वाङ्मयापासून बहुतांशीं च्युत झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोचीनकडे मलयाली भाषा कोंकणींत शिरली आहे आणि तामिळमधील लिंगभेदराहित्य तंजावरच्या मराठींत शिरलें आहे. महाराष्ट्रीय भाषेंतील ग्रंथांचें वजन जर कोठें पडत असेल तर तें ब्रिटिश हद्दींतील महाराष्ट्रांत व इंदूर, बडोदें सारख्या मराठी संस्थानांतील सुशिक्षित वर्गावर पडतें. आंकड्यांनीं सांगावयाचें म्हटल्यास दोन कोट महाराष्ट्रीयांपैकीं एक कोट अडतीस लक्ष लोकवस्तींतील सुशिक्षित वर्गावरच फक्त मराठी वाङ्मयाचा परिणाम होणें शक्य आहे.

१६. **परकीय संप्रदाय व महाराष्ट्रीय समाज**—महाराष्ट्रामध्यें परकीय संस्कृतीस घट्ट चिकटून पाहणारे संप्रदाय म्हटले म्हणजे मुसलमान व ख्रिस्ती हे होत. ख्रिस्ती मंडळीमध्यें रोमन क्याथोलिक संप्रदाय देश्यांस बाह्य संस्कृतींत प्राटेस्टंटापेक्षां अधिक नेऊन सोडतो; आणि मुसलमानी संप्रदाय त्याचा स्वीकार करणाऱ्या हिंदूस हिंदूंपासून ख्रिस्ती झालेल्या मनुष्यापेक्षांहि फारच दूर करतो व स्थानिक भाषेचें बल कमी करतो. बाह्य संस्कृतीचा प्रसार म्हणजे हिंदु संस्कृतीचा व हिंदूंनीं निर्माण केलेल्या वाङ्मयाचा नाशच होय. ख्रिस्ती व मुसलमान या केवळ पारमार्थिक विचारपरंपरा नसून विशिष्ट संस्कृतीचा अभिमान धरणारीं शास्यें आहेत. शास्य म्हणजे व्यक्त किंवा अव्यक्त अशा नियमांनीं बद्ध होऊन स्वतंत्र भासणारा व्यक्तींचा समुदाय. हिंदूंचें एकत्व त्यांच्या संस्कृतीमुळेंच आहे. ती कमी झाली म्हणजे त्यांचें संख्याबल कमी झालेंच. भावी संख्याबल म्हणजे स्थूलदार्ढ्य हें आजच्या घटनाबलावर उर्फ घटनादार्ढ्यावर अवलंबून असतें आणि यासाठीं हिंदूंची घटना बलवान केली पाहिजे.

समाजनाश म्हणजे समाजाच्या केंद्राचा उर्फ शासनतंत्राचा नाश होय. समाजनाश होतो तो दोन प्रकारानें होतो. एक तर समाजांतील व्यक्तींचा नाश होतो त्यामुळें समाज लयास जातो, अगर समाजांतील व्यक्तींचा नाश न होतां घटनेचा नाश होतो आणि व्यक्ति अन्य समाजांत प्रवेश करिते. एखादा विशिष्ट समाज लोकांच्या संरक्षणास अवश्यक नसेल तर तो समाज मोडल्यानंतर मनुष्य समाजहीन स्थितींत राहूं शकेल. उदाहरणार्थ, आपल्या देशांत दोन दिवस जगणाऱ्या संस्था, पंथ व समाज अनेक आहेत व होऊन गेले. ते समाज अगर पंथ नष्ट झाले याचा अर्थ त्या मतांचीं माणसें नष्ट झालीं असा नाहीं, तर त्या मताच्या निरनिराळ्या मनुष्यांस एकत्र ठेवणारी जी घटना होती ती नष्ट झाली. हिंदू समाज ही विशिष्ट संस्कृतीनें बद्ध झालेली समाजघटना होय.

एखाद्या संस्थेची घटना चांगली नसली म्हणजे तिची वाताहत होते. हिंदुसमाजाला शासनघटना मुळींच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. चातुर्वर्ण्य म्हणजे कांहीं व्यवस्थित अशी घटना नाहीं. तें घटनातत्त्व आहे. तें सामाजिक ध्येय आहे. समाजांत चार वर्ग असतात; व या वर्गांतील प्रत्येक व्यक्तीनें आपलें वर्गविशिष्ट काम केलें म्हणजे समाज इष्ट स्थितींत राहील एवढा एक तात्त्विक सिद्धांत मात्र सर्वमान्य झाला आहे. ज्या तत्त्वावर समाजरचना करावयाची त्या तत्त्वास इंग्रजींत कान्स्टिट्यूशन उर्फ घटनातत्त्व म्हणतात. या तत्त्वावर समाजशासनाची घटना बनविण्याचें हिंदूंचें ध्येय आहे. तें ध्येय अमलांत आलें नाहीं. सध्यां तीन हजार जाती आहेत. त्यांपैकीं कांहीं जातींमध्यें जातीचा व्यक्तीवर पगडा आहे व जातीचे नियम व्यक्तीस पाळावयास लावण्याची जातीस धमक आहे. इतर जातींत तोहि प्रकार नाहीं. व्यक्तीनें कांहीं केलें तर जात त्यास कांहीं एक करूं शकत नाहीं. जात केवळ त्याच्या लग्नसंबंधास अडथळा करण्यास मात्र अस्तित्वांत आहे.

१७. **हिन्दूंचें समाजदौर्बल्य**—समाजाच्या अनियंत्रित स्थितीमुळें आणि कांहीं अंशीं अयोग्य निर्बन्धामुळें समाजाचे तुकडे मात्र पडतात. जुन्या तऱ्हेचे अनिष्ट निर्बंध ह्मटले ह्मणजे मुख्यत्वेंकरून खालील प्रकारचे आहेत.

(१) आपल्या समाजांतील निकृष्ट वर्गाचा आपण विटाळ मानतों पण मनुष्य आपल्या समाजांतून निघून परक्या समाजांत गेला, ह्मणजे महार ख्रिस्ती अगर मुसलमान बनला तर त्याचा विटाळ आपण मानीत नाहीं. हा नियम समाजघातास कारण होत आहे.

(२) एखाद्या हिंदु स्त्रीवर ख्रिस्त्यानें अगर मुसलमानानें बलात्कार केला तरी देखील ती दोषी नसतांहि तिचा आपण त्याग करतों.

(३) आपल्या समाजांत पूर्वपरंपरागत सोंवळ्या ओंवळ्यांच्या कल्पनांच्या प्रखरतेमुळें, आपण आपल्या समाजाच्या द्रव्योत्पादनास विघ्न आणतों, आणि परक्या समाजाचें द्रव्यबल आणि द्रव्यबलामुळें उत्पन्न होणारें इतर प्रकारचें बल वाढवितों. उदाहरणार्थ, कातड्यांचा व्यापार आज आपण मुसलमानांच्याच हातीं ठेविला आहे.

(४) सर्व समाजातर्फे कार्य करण्यास अधिकारी पुरुष कोणी नसल्यामुळें, स्वतःच्या समाजाचें हित पाहण्यास, त्या समाजाची अभिवृद्धि करण्यास आपणांमध्यें कोणीहि समर्थ नाहीं. जुन्या धर्मशास्त्राचा नियम बाजूस ठेवण्यास आणि त्याच्यामध्यें फेरबदल करण्यास आज कोणीहि समर्थ नाहीं; आणि यामुळें रूढीचें साम्राज्य ह्मणजे अडाणी लोकांचा सज्ञानी लोकांवर अधिकार चालत आहे.

समाजाचे तुकडे पडत आहेत. समाजांतून बाहेर पडलेला मनुष्य पुन्हा परत घेण्याची ताकद समाजास कमी झाली आहे, आणि परक्या मनुष्यास आपल्या समाजामध्यें समाविष्ट करण्याची ताकद आपणांमध्यें मुळींच नाहीं. असो.

वृद्धिक्षयासंबंधीं आणि सामाजिक बलाबलासंबंधाचीं प्रथमतः येथें तीनच तत्त्वें विशेष विचारासाठीं घेऊं.

(१) समाजाचा क्षय समाजांतील माणसें दुसऱ्या समाजांत गेल्यानें होतो.

(२) समाजांतील निरनिराळ्या माणसांस एक सूत्राखालीं आणणाऱ्या शासन-संस्था नष्ट झाल्यास समाज बलहीन व क्षयाभिमुख होतो.

(३) एखाद्या समाजाशीं विशिष्ट संस्कृति संलग्न झाली असतां त्या संस्कृतीच्या बलाबलाचा परिणाम समाजाच्या बलाबलावर होतो.

हीं तत्त्वें आपण उदाहरणार्थ मध्यप्रांतास लावून आपणांस कोणतें कर्तव्य उत्पन्न होतें याचा विचार करूं. आपले समाजाच्या वृद्धिक्षयासंबंधाची वस्तुस्थिति जितकी आंकड्यांनीं मोजतां येईल तितकी मोजण्याचा प्रयत्न करूं.

१८. **सर्व राष्ट्रहित आणि हिंदूंचें हित**—मध्यप्रांतांतील सामाजिक प्रश्नाचा विचार करतांना प्रथम आपण असा विचार करूं कीं, आपण कोणत्या समाजाविषयीं विचार करणार ? आणि आपण म्हणजे कोण ! " आपण " या शब्दाचा अर्थ येथें समूहवाचक आहे. आपणांपैकीं सर्व मंडळी अनेक समूहांचे अवयव आहोंत, सामाजिक दृष्टीनें पहातां आपण हिंदु आहोंत, महाराष्ट्रीय आहोंत आणि या महाराष्ट्रीयांपैकीं विशेष जातींचे अवयव आहोंत. "आपण" याचा अर्थ सर्व तऱ्हेनें होणार आहे. प्रथमतः " आपण " या शब्दाचा अर्थ मी एवढाच घेतों कीं, आपण ह्मणजे " हिंदु " व हिंदूंपैकीं विशेषतः विचार करणारा वर्ग. समाजाचें नियमन समाजांतील बौद्धिकदृष्ट्या उच्च वर्गांतीलच मनुष्यांच्या दृष्टीनें झालें पाहिजे हें ध्येय सर्वच समाजांत असतें. हिंदूंविषयीं विचार करतांना हिंदूंनीं स्वहितसाधनार्थ काय खटपट केली पाहिजे याचा विचार केला पाहिजे. केवळ राजकीयदृष्ट्या ह्मणजे सरकारनें काय करावें आणि लोकांपासून काढलेल्या पैशाचा काय उपयोग

करावा या दृष्टीनेंच विचार करीत असतां हिंदू व मुसलमान हा विचार बाजूस ठेवावयाचा, असें असलें तरी हिंदूंचें विशिष्ट हित ह्मणून कांहीं निराळें आहे ही गोष्ट आपण लक्षांत ठेवलीच पाहिजे. हिंदूंच्या वृद्धिक्षयात्मक हितास सर्वराष्ट्रीय हिताच्या कांहीं गोष्टींपेक्षां मीं अधिक महत्त्व देतों. उदाहरणार्थ—लाखों हिंदु अगर मुसलमान ख्रिस्ती होत असतां समाजांतील विचारी वर्गानें कौन्सिलांतील खुर्च्यांबद्दल भांडाभांड करणें आणि सिव्हिल सर्व्हिसमध्यें हिंदी लोकांचा प्रवेश करविणें या गोष्टींकडे अधिक लक्ष देणें ह्मणजे चूक होत आहे असें माझें मत आहे. माझ्या मतानें एक लाख हिंदु जर मुसलमान झाले तर जें नुकसान होईल तें नुकसान सिव्हिल सर्विसमधील सर्व हिंदी लोक काढून टाकले तरी होणार नाहीं. समाजाच्या अस्तित्वविषयक गोष्टींना महत्त्व अधिक आहे. आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य कायम रहावें ही गोष्ट जितकी महत्त्वाची तितकीच, हिंदूंचें हिंदुत्व कायम रहावें ही महत्त्वाची गोष्ट आहे.

१९. **हिंदूंची सामाजिक दृष्टि**—हिंदु समाजाचें बलवर्धन सिव्हिल सर्विसच्या पांच पंचवीस जागा मिळाल्यानें होणार नाहीं; आणि हिंदुसमाजाचें बलवर्धन होणें फारच अवश्य आहे. ज्याप्रमाणें सर्व ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानीयांनीं बलाढ्य व्हावें ही गोष्ट आपण आपलें कर्तव्यकर्म समजतों, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांत हिंदूंचें प्रामुख्य राखणें कर्तव्य समजून तदर्थ खटपट केली पाहिजे. राष्ट्राचें शासनस्वरूप जनतेच्या इच्छेप्रमाणें असलें पाहिजे हें खरेंच, पण जनता देखील इष्ट स्थितींत राखणें आपलें कर्तव्य होय. हिंदुस्थानांत आणखी दोन चार कोटी मुसलमान वाढले आणखी चार पांच कोटी ख्रिस्ती वाढले तर हिंदुस्थानास स्वराज्य मिळून तरी काय उपयोग ? आमच्या भाषा, आमची सर्व संस्कृति लयाला जाईल, आपल्या देशांत हिंदूंना परक्यांचें सांस्कृतिक दास्य आपोआपच उत्पन्न होईल. सिंधमध्यें चार-पंचमांश लोक मुसलमान आहेत. सिंधी भाषा जरी वेदभाषाजन्य आहे तरी ती फारसी शब्दांनीं युक्त आहे, आणि ती फारसी भाषेप्रमाणेंच उलटीकडून लिहिली जाते. या प्रांतांतील लोक तर संस्कृत वाङ्मयास पारखेच आहेत व यांना कांहीं उच्च तत्त्वज्ञान पाहिजे असेल तर तें फारसी ग्रंथांतून घेतात आणि सिंधमधील सुशिक्षित हिंदूंचा वेळ फारसी ग्रंथकारांची व मुसलमान फकीरांची तारीफ करण्यांतच जातो. मध्यप्रांतांत मुसलमान व ख्रिस्ती लोकांचा सुळसुळाट फारसा नाहीं व त्यामुळें हिंदी भाषेचा संकोच करण्यास उर्दू भाषा फारशी सरसावत नाहीं. तथापि मुसलमानी संप्रदाय जर वाढूं लागेल तर आपणांपुढें मोठाच प्रश्न उत्पन्न होईल.

हिंदूंची स्वकीय आणि बाह्य संप्रदायांसंबंधीं दृष्टि—मुसलमान आणि ख्रिस्ती ही केवळ परमार्थ साधनें नसून जातिस्वरुप ' शास्यें ' आहेत आणि तीं ' शास्यें ' असल्यामुळें आमच्या विघातालाच कारण व्हावयाचीं. निरनिराळ्या परक्या संप्रदायांविषयीं आत्महिताहित ज्ञानावर तयार झालेली आपली वृत्ति आहे ती येणेंप्रमाणें—

(१) हिंदूंमधीलच एखादा संप्रदाय वाढला अगर कमी झाला तर त्यांत कांहीं फिकीर नाहीं.

(२) आर्यसमाज व ब्रह्मसमाज या संप्रदायांचा प्रसार मुसलमान व ख्रिस्ती लोकांत झाला तर तें आम्हांस हवेंच आहे. "ब्रह्मो" संप्रदायाच्या मतांचा प्रसार हिंदु समाजांत होणें फारसें इष्ट नाहीं, कारण इंग्रजांचें शूद्रत्व पत्करावयास लावणारा वेड्या मंडळींचा हा समाज आहे. हा समाज मुसलमानांत फारसा पसरत नसतां हिंदूंमध्येंच ' हिंदुत्व ' कमी करतो व बुद्धिभेद करतो आणि समाजदौर्बल्य उत्पादितो. यासाठीं तो धर्मनाशक व राष्ट्रनाशक आहे. आर्यसमाज ब्राह्मणेतरांमध्यें संस्कृत गीर्वाण व हिंदु संस्कृति याविषयीं अभिमान उत्पन्न करतो, त्यामुळें एका दृष्टीनें तो चांगला आहे.

(३) मुसलमान व ख्रिस्ती संप्रदाय यांपैकीं ख्रिस्ती संप्रदायाचा प्रसार मुसलमानी संप्रदायाचे प्रसाराइतका राष्ट्रघातक नाहीं. कारण इंग्रज महारास जरी ख्रिस्ती करतो तरी त्यास दूरच ठेवितो व उच्च ब्राह्मणख्रिस्त्यास देखील ख्रिस्ती इंग्रज आपणांहून हलका समजतो. एतद्देशीय ख्रिस्त्यांस इंग्रजांनीं तुच्छ समजावें हेंच हिंदुसमाजास हितावह आहे, कां कीं तशी गोष्ट नसल्यास हिंदूंपासून पूर्णपणें अलग होण्यास त्यांस स्फूर्ति होईल. आज एतद्देशीय आणि परके ख्रिस्ती यांत असलेल्या द्वैतामुळें एतद्देशीय ख्रिस्त्यांची संस्कृति पूर्णपणें इंग्रजांची होणें शक्य नाहीं. मुसलमानांची सामाजिक भावना ख्रिस्त्यांच्या सामाजिक भावनेपेक्षां बळकट आहे. यामुळें ख्रिस्ती संप्रदाय मुसलमानी संप्रदायाइतका हिंदु संस्कृतीला विघातक नाहीं. या भेदामुळें मुसलमान अधिकाधिक ख्रिस्ती झाल्यास तें आह्मांस दुःखदायक नाहीं.

मुसलमान व ख्रिस्ती या दोन्ही संप्रदायांचा प्रसार आपणांस नको असल्याकारणानें या संप्रदायांची वाढ कशी काय होत आहे हें आपण काकदृष्टीनें पाहिलें पाहिजे.

२०. **ख्रिस्ती संप्रदायाची वाढ**— इ. स. १९०१ पासून इ. स. १९११ पर्यंत जीं दहा वर्षे गेलीं त्यांत मध्यप्रांतांत ख्रिस्ती लोकांची संख्या तिप्पट झाली आणि ही वाढ होण्यास मुख्य कारण म्हणजे जाशपुर नांवाच्या संस्थानांत ३६००० ओराओन जातीचे लोक ख्रिस्ती झाले. ख्रिस्ती संप्रदाय ज्या ठिकाणीं वाढला त्यापैकीं मुख्य प्रदेश म्हटले म्हणजे दमो, चादा, नेमाड आणि बस्तर हे होत. एकंदरींत अजूनहि ख्रिस्ती समाज देशास विघ्न होईल इतका मध्यप्रांतांत वाढला नाहीं. तथापि त्या समाजाच्या वाढीचें प्रमाण भयकारक आहे.

मध्यप्रांतांत असलेलें हिंदूंचें श्रेष्ठत्व—देशांतील निरनिराळे भाग पहातां, जनतेच्या सादृश्याच्या बाबतींत मध्यप्रांत हा इतर प्रांतांपेक्षां अधिक सुखी आहे असें म्हटलें असतां हरकत नाहीं. काश्मीर, पंजाब, बंगाल व सिंध येथें शेंकडा ५० पेक्षां अधिक मुसलमान आहेत. मध्यप्रांतांतील दहा हजार माणसें घेतलीं तर या दहा हजारांपैकीं सुमारें आठ हजार खानेसुमारीच्या व्याख्येप्रमाणें " हिंदु " आहेत. आणि सुमारें दीड हजार वन्य जातींचे आहेत असें सेन्सस रिपोर्ट सांगतो.

" हिंदु " आणि " वन्य "—येथें हिंदु आणि वन्य जाती या प्रकारच्या सरकारी वर्गीकरणावर थोडेसे विचार व्यक्त करून पाऊल पुढें टाकतों. हिंदु आणि वन्य या लोकांस निरनिराळे करण्याची ही सरकारी पद्धति मोठी मौजेची आहे. कारण " हिंदु " म्हणजे पारमार्थिक विचारांनीं निर्णीत केलेला समूह नसून " हिंदु " म्हणजे हें " शास्य " (Polity) आहे. म्हणजे विशिष्ट शासनसंस्थांनीं निर्णीत केलेला हा एक समुदाय आहे. हिंदु म्हणजे काय या विषयींच्या कल्पनांचें अज्ञान सेन्ससचे कमिशनर मि. गेट यांच्या डोक्यांतून अजून गेलें नाहीं. केवळ शास्त्रीयदृष्ट्या मि. गेट यांनीं मतें बनविलीं नसून हिंदुविरोधमूलक राजकिय विचारांनीं आपलीं मतें बनविली कीं काय असा मला बळकट संशय येतो. कारण मागें एकदां पंजाबाच्या मुसलमानांनीं ओरडीस प्रारंभ केल्याबरोबर मि. गेट हे दूरदर्शी गृहस्थ हिंदूसमूहांतून अस्पृश्य जातींचें निराळे वर्गीकरण करण्याच्या तयारींत होते.

मध्यप्रांतांत दहा हजार डोक्यांमध्यें मुसलमानांचें प्रमाण फक्त ३६५ आहे. म्हणजे १०० डोक्यांमध्यें ९५ डोकीं (वन्य हिंदूंचा अंतर्भाव हिंदूंतच केला असतां) हिंदूचींच सांपडतील. ३॥ मुसलमानांचीं सांपडतील, आणि इतर सर्व जाती मिळून १॥ डोकीं हें प्रमाण भरेल. ' ॲनिमिस्ट ' उर्फ ' वन्यजाति ' या हिंदूंतून वगळण्याची, लबाड इच्छेनें अगर अज्ञानानें तयार झालेली वृत्ति अधिकाअधिक वाढूं लागली आहे. यास प्रमाण पाहिजे असल्यास ' हिंदू ' चे व ' ॲनिमिस्टां ' चे आंकडे पहावेत. इ. स. १९०१ पासून इ. स. १९११ पर्यंत हिंदूंची वाढ फक्त शेंकडा १६ झाली आहे. आणि ' ॲनिमिस्टांची ' शेंकडा ३० झाली आहे. इ. स १८८१ पासून इ. स. १८९१ पर्यंत हिंदूंची वाढ फक्त शेंकडा ८ प्रमाणें झाली आहे आणि ' ॲनिमिस्टांची ' शेंकडा २५ प्रमाणें झाली आहे. इ. स. १८८१ पासून इ. स. १९११ पर्यंतचा जर हिशेब घेतला तर हिंदूंची वाढ फक्त शेंकडा १६ प्रमाणें झाली व ॲनिमिस्टांची शेंकडा ४६ प्रमाणें झाली. या सर्व आंकड्यांचा अर्थ काय करावयाचा ? ज्या देशांत रेलवे एकसारखी वाढत आहे, शहरें वाढत आहेत अशा देशांत सुधारलेल्या हिंदूंमध्यें वन्यताच वाढत चालली आहे काय ? ' ॲनिमिस्ट ' जाति नष्ट होण्याच्या पंथास लागल्या आहेत असें मानवशास्त्रवेत्ते म्हणतात, आणि हिंदुस्थान सरकारचे मानवशास्त्रवेत्ते हेंच म्हणत नाहींत काय ? वरील आकड्यांचा अर्थ एवढाच करावयाचा कीं वन्य जातींतील लोक हिंदूंच्या बाहेर वगळावयाची पद्धति या सरकारच्या खानेसुमारी खात्यांत पडली आहे. आणि या प्रवृत्तीचें कारण एक तर अज्ञान असावें किंवा लोकांमध्यें भेद पाडण्याची इच्छा असावी. शीख लोकांस हिंदूंच्या वेगळे समजून कांहीं दिवस शीखांची खुशामत करण्याचा आणि त्यांस वेगळेपणा भासविण्याचा प्रकार ज्याप्रमाणें पंजाबांत सुरू आहे तोच सेन्ससखात्यांतहि सुरूं आहे. पंजाबांतील शिखांस आपण हिंदूच आहों असें वाटतें, इतर हिंदूंस तसेंच वाटतें पण इंग्रजांस मात्र तसें वाटत नाहीं !! असो.

आंता आपण मुसलमानांच्या प्रश्नाकडे वळूं, आणि मुसलमानांच्या वाढीचें अवलोकन करून त्यापासून काय शिकावयाचें तें पाहूं.

२२. **मुसलमानांची वाढ आणि तिचें पृथक्करण**—मध्यप्रांतांत एकंदरींत पाहतां, गेल्या दहा वर्षांमध्यें हिंदूंची वाढ शेंकडा १६ याप्रमाणें झाली आहे आणि सुसंस्कृत हिंदु आणि वन्य हिंदु यांच्या संख्या एकत्र केल्या असतां शेंकडा १७ प्रमाणें झाली आहे. मुसलमानांची वाढ हिंदूंच्या वाढीइतकी झाली नाहीं. गेल्या दहा वर्षांत मुसलमानांची वाढ शेंकडा १३ याप्रमाणें झाली आहे. व या वाढीच्या फरकामुळें एकंदर दहा हजार डोक्यांत मुसलमान डोकीं इ. स. १९०१ सालीं ३८२ होतीं, तीं इ. स. १९११ सालीं ३६५ झालीं आहेत, तथापि इ. स. १८८१ पासून हिशोब केला तर मुसलमान शेंकडा २४ आणि हिंदू शेंकडा १६ या प्रमाणानें वाढलीं आहेत. म्हणजे तीस वर्षांच्या अनुभावानें असें सिद्ध होतें कीं मुसलमानांच्या वाढीचा वेग हिंदूंच्या वाढीच्या दीडपट आहे. स्वाभाविक कारणानें म्हणजे मृत्यूपेक्षां जननाच्या आधिक्यामुळें मुसलमानांची हिंदूंपेक्षां अधिक वाढ फारशी होत नाहीं तर हिंदूंचे मुसलमान झाल्यानें होते अशी माझी समजूत झाली आहे. कां कीं (१) ज्या भागांत वन्य लोक जास्त, त्या भागांत मुसलमानांच्या वाढीची संख्या जास्त दिसते आणि (२) वन्य लोकांत मुसलमान अगर ख्रिस्ती होण्याची प्रवृत्ति अधिक आहे. यावरून जेव्हां मुसलमानांची वाढ वन्य प्रदेशांत होते, तीं वन्य लोक बाटल्यामुळेंच होते हें उघड होय. (३) चोहोंकडे पाहिलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं मुसलमानांची हिंदूंशीं तुलना करितां, मुसलमानांचें मृत्यूचें प्रमाण जास्त आहे, आणि जननाचें कमी आहे. मृत्यूपेक्षां जननाच्या आधिक्यामुळें गेल्या तीस वर्षांत हिंदूंचीच लोकसंख्या शेंकडा १६ प्रमाणानें वाढली. जैनांची शेंकडा ८ या प्रमाणानें वाढली. पारशांची शेंकडा १० प्रमाणानें वाढली. मुसलमानांची साधारणपणें वाढनीच असावी असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रसंगीं ती कमीहि असू शकेल. कारण गेल्या दशकांत ती वाढ फक्त शेंकडा तेरा या प्रमाणानेंच झाली. वन्य लोकच अधिक मुसलमान अगर ख्रिस्ती होतात या विधानाच्या सिध्यर्थ आंकडे पुढें येतीलच.

मुसलमानांच्या संप्रदायवर्धनामुळें झालेलें वाढीचें प्रमाण गेल्या तीस वर्षांत मध्यप्रांतांत शेंकडा कमींत कमी आठ आहे असें दिसून येतें. म्हणजे स्वाभाविक कारणांमुळें होणाऱ्या वृद्धीशीं संप्रदायवर्धनामुळें होणाऱ्या वृद्धीची तुलना केली तर संप्रदायवृद्धीचें म्हणजे हिंदुनाशाचें बल स्वाभाविक वृद्धीच्या शेंकडा पन्नासपेक्षांहि अधिक आहे. म्हणजे शंभर जर मुसलमान स्वाभाविक कारणामुळें वाढतील तर पन्नासाहून अधिक मुसलमान हिंदू बाटल्यामुळें वाढतात.

आतां, मुसलमानांच्या संप्रदायवृद्धीचें अधिक पृथक्करण करूं. हिंदू बाटल्यामुळें जे मुसलमान होतात ते कोठें, आणि कसे होतात हें आपण पाहूं. संयुक्त मध्यप्रांताच्या (वऱ्हाड व मध्यप्रांत) मधोमध चार जिल्हे आहेत ते मंडला, बालाघाट, भंडारा आणि चांदा असे आहेत. या लांबलचक पट्ट्याच्या पूर्वेकडे म्हणजे छोटा नागपूर, छत्तिसगड आणि बस्तर संस्थान येथें मुसलमान फारच थोडे आहेत. बस्तर संस्थानामध्यें एक हजारांमध्यें पांच लोक देखील मुसलमान नाहींत. पूर्वेकडील इतर भागामध्यें एक हजार लोकसंख्येंत फक्त पांचपासून पंधरा मुसलमान आहेत. मधोमध असणाऱ्या चार जिल्ह्यांमध्यें पंधरापासून तीस आहेत. आणि पश्चिमेकडील भागांत तीसपेक्षां अधिक असून अत्यंत पश्चिमेकडील जिल्हे म्हणजे बुलठाणें, अकोला आणि नेमाड येथें ७० पासून १०० पर्यंत आहेत. 'ॲनिमिस्ट' उर्फ 'वन्य हिंदु' यांचा हिशोब पाहिला तर अगदीं उलटी गोष्ट दिसून येते. अगदीं पश्चिमेकडच्या भागांत म्हणजे बुलठाणें, अकोला आणि नेमाड येथें एक हजार लोकसंख्येंत वीस देखील वन्य हिंदु नाहींत. आणि पूर्वेकडील भागांत, कोरिया, बस्तर येथें एक हजारांत ६० पासून ७० वन्य लोक आहेत, आणि उदेपूर (आमच्या प्रांतांत देखील ज्याप्रमाणें एक "कोरिया" आहे तसें एक छोटेंसें "उदेपूर" देखील आहे.) यासारख्या ठिकाणीं तर ७० वर आहेत. यावरून जेथें वन्य हिंदु जास्त तेथें मुसलमान कमी, असा प्रकार दिसतो. वन्य हिंदु कमी असलेला असा जो मध्यप्रांतांतील महाराष्ट्र तेथें मुसलमानांच्या वाढीचें प्रमाण गेल्या दहा वर्षांत शेंकडा काय तें ११ आहे. आणि नेमाडसारख्या ठिकाणीं जेथ वन्य हिंदु फारच कमी तेथें शेंकडा ९ आहे. छत्तीसगडसारख्या मागसलेल्या प्रदेशांत मुसलमानांच्या वाढीचें प्रमाण शेंकडा १८ दिसतें, आणि त्याहूनहि मागसलेला प्रदेश जो छोटा नागपूर तेथें मुसलमानाच्या वाढीचें प्रमाण शेंकडा ४५ झालें आहे.

यावरून येवढें दिसून येईल कीं मुसलमानांच्या स्वाभाविक वृद्धीपेक्षां आपली स्वाभाविक वृद्धि जरी मोठी आहे आणि त्यामुळें आणि आपल्या संख्यामहत्त्वामुळें आपली वाढ फारच अधिक दिसते तरी, स्वाभाविक वृद्धीहून अन्य कारणांनीं मुसलमानी संप्रदायाची वृद्धि जी होत आहे ती फार झपाट्यानें होत आहे. हिंदूंच्या जात्यंतरामुळें होणारी वृद्धि थोडी असली तरी घातुक आहे.

दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची म्हटली म्हणजे आपल्या प्रांतांतील वन्य जातींमध्येंच ख्रिस्ती व मुसलमान संप्रदायांचा प्रसार होत आहे, आणि तो जर आपणांस बंद पाडावयाचा असेल तर आपणांमध्यें वन्यांस सुधारण्यासाठीं, आणि त्यांस रामायण, महाभारतादि ग्रंथांचें ज्ञान करून देण्यासाठीं एक धार्मिक चळवळ पाहिजे.

२३. शासनसंस्थांचा अभाव आणि तज्जन्य समाजदौर्बल्य—आतां आपण दुसरें एक तत्त्व विचारासाठीं घेऊं. तें तत्त्व म्हटलें म्हणजे समाजाच्या शासनसंस्था नष्ट होऊं लागल्या असतां समाजास दौर्बल्य प्राप्त होतें हें होय. हा नियम आपणांस असें कर्तव्य बोधितो कीं हिंदु समाजांत शासनसंस्था उत्पन्न केली पाहिजे. आणि हिंदु समाजांत एकसूत्रता आणून समाजवृद्धीचें अगर समाजरक्षणाचें कार्य त्या संस्थेनें आपल्या हातीं घतलें पाहिजे. या प्रयत्नाची अवश्यकता लक्षांत येण्यास प्रकृत स्थितीचा विचार करूं. प्रथम समाजांतील विस्कळीतपणाचाच दोष अधिक स्पष्टतेनें पुढें मांडतों.

बऱ्याचशा जातींस त्या त्या जातींसंबंधानें कार्यकर्ती संस्था नाहीं आणि तशा संस्था प्रत्येक जातींत निघाल्या-शिवाय समाजामध्यें एकसूत्रता उत्पन्न होणार नाहीं.

वन्यहिंदूंशीं असलेला संबंधाभाव—वन्य जातींचा एकंदर हिंदु समाजाशीं संबंध फारच अल्प येतो. बऱ्याचशा जातींचा संबंध ब्राह्मण जातींशीं ब्राह्मणांच्या परमार्थोद्यमामुळें येतो, तथापि बऱ्याच अशा जाती आहेत कीं त्यांचा संबंध ब्राह्मणांशीं अगर आपल्या देवळांशीं येत नाहीं.

हिंदु समाज हा संप्रदाय नसून शासनात्मक संस्थांनीं झालेलें एक 'शास्य' (Polity) आहे हें मी अनेकदां स्पष्ट करून सागितलेंच आहे. या शास्याचे मुख्य तंत्री ब्राह्मणच आहेत. आणि म्हणून जेव्हां जेव्हां समाजाचा आणि ब्राह्मणाचा संबध कमी होईल तेव्हां तेव्हां जनतेचें दौर्बल्य वाढेल या दौर्बल्यास उपाय करूं इच्छिणारानें ब्राह्मण कोणकोणत्या जातींपर्यंत पोहोंचत नाहींत हें प्रथम पाहिलें पाहिजे. याचे कांहीं आंकडे खानेसुमारीच्या रिपोर्टांत दिले आहेत ह्या रिपोर्टांत शुद्धता पुष्कळच कमी आहे. तरी आहे त्या माहितीचाच उपयोग केला पाहिजे. उदाहरणार्थ शुद्धतेची कमतरता दाखविण्यासाठीं एक दोन गोष्टींचाच उल्लेख करितों. प्रथमत: " बैगा " जातीची गोष्ट घेऊं. ज्या जाती ब्राह्मणांचें प्रामुख्य कबूल करीत नाहींत अशा जातींत ' बैगा ' ही जात " सेन्सस रिपोर्ट " कारांनीं दिली आहे; आणि त्या जातींचें बल ३०३९१ म्हणून दिलें आहे. पुढें तीच जात त्याच आंकड्यांसह " ब्राह्मणांपासून अगर दुसऱ्या कोणत्या हिंदु गुरूंपासून उपदेश न घेणाऱ्या " जातींच्या यादींत दिली आहे ! पुन्हां तीच जात मोठमोठ्या हिंदु देवतांचें पूजन न करणाऱ्या जातींच्या यादींत तेच आंकडे देऊन दिली आहे ! ! " बैगा " जातींत हिंदुत्वाचा अभाव आहे अशा अर्थाची तीन विधानें करून पुन्हा प्रस्तुत रिपोर्ट-वाल्यांनीं ज्या जातींचें उपाध्येपण उच्च प्रकारचे ब्राह्मण करीत नाहींत तर हलके जातीचे ब्राह्मण करतात अशा जातींच्या यादींत तीच " बैगा " जात त्याच आंकड्यांसह दिली आहे ! ! ! हीच गोष्ट " भैना ", " भुइहार ", " ओराओन " इत्यादि जातींसंबधानें झाली आहे. तसेंच जे लोक ब्राह्मणांपासून अगर हिंदु गुरूंपासून मंत्र घेत नाहींत अगर हिंदु देवतांचें पूजन करीत नाहींत अगर वेदाचा अधिकार कबूल करीत नाहींत अशा तिन्ही प्रकारच्या याद्यांमध्यें सर्व म्हणजे तेवीस लाख गोंडांचा अंतर्भाव केला आहे. अर्थात् या सर्व गोष्टी गोंडांस लावणें चूक आहे. तथापि तशी चूक होण्याचें कारण तरी काय असावें ? याचें मुख्य कारण हें कीं, एतद्विषयक गोष्टींचें सत्य स्पष्टपणें समजणें शक्य नाहीं. तेवीस लाख गोंडां-पैकीं ब्राह्मणांस अगर हिंदु देवतांस किती गोंड मानतात आणि किती मानीत नाहींत हें थोड्या अवधींत सेन्ससकार कसें काढणार ? अर्थात् त्यांच्या झालेल्या चुका क्षम्य आहेत असें म्हणावें.

२४. मुंबई इलाख्यांत हिंदुत्वाचें बलाबल—मुंबई इलाख्यांत हिंदु व इतर, यांची परिस्थिति येणेंप्रमाणें आहे. मुंबई इलाख्यांत इ. स. १८८१ पासून इ. स. १९११ पर्यंतच्या कालावधीमध्यें हिंदु शेंकडा १८ या प्रमाणानें वाढले; जैन शेंकडा २ या प्रमाणानें कमी झाले; वन्यजातीचे लोक शेंकडा ६६ या प्रमाणानें कमी झाले; ख्रिस्ती शेंकडा ६६ या प्रमाणानें वाढले; पारशी शेंकडा १३ या प्रमाणानें वाढले आणि ज्यू शेंकडा ४५ या प्रमाणानें वाढले. याशिवाय इतरांच्या आंकड्यांकडे दुर्लक्ष केलें तरी चालेल.

ज्यूमध्यें इतरांस घते नाहींत * त्यामुळें त्यांची वाढ स्वाभाविक कारणांमुळें झाली असावी. जन्मलेल्याचें बालपणीं आईबापांकडून व नंतर स्वत: चांगल्या तऱ्हेनें संरक्षण झाल्यानें समाज परकीय रक्ताचा स्वीकार न करतां देखील कसा

* यूरोपांतील ज्यू यूरोपीयन ख्रिस्त्यांस कधीं कधीं आपणांमध्यें घेतात. अमेरिकेंत देखील गोऱ्या अमेरिकनांस प्रसंगीं घेतात पण सिद्दी लोकांस घेत नाहींत.

काय वाढतो याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. यहुद्यांच्या आंकड्यांचें व त्यांच्या वृद्धीचें अधिक पृथक्करण केलें पाहिजे. मुंबई इलाख्यांत १६१०९ ज्यू आहेत त्यांपैकीं बेने-इस्रायल किती आहेत याची मोजदाद चांगली झाली नाहीं. बेने-इस्रायल म्हणजे आपल्या जवळचे लोक होत. त्यांची भाषा मराठी आहे. त्यांच्या बायका मराठी तऱ्हेचें लुगडें नेसतात; व त्या थोड्या मंडळीनें देखील जातीच्या मानानें मराठी भाषेची जेवढी सेवा केली आहे तेवढी सेवा दुसऱ्या फारच थोड्या जातींनीं केली असेल. यामुळें यहुद्यांत या जातीची वाढ जर होत असली तर ती गोष्ट आपणांस आनंदाची आहे†. महाराष्ट्रीय इस्रायल गरीब आहेत तथापि त्यांचा उत्कर्ष होत गेला तर इतर यहुद्यांवर त्यांचें वजन पडून त्यांची भाषा देखील मराठी होईल.

मुंबई इलाख्यांत हिंदूंची वाढ मुसलमान व ख्रिस्ती यांच्यापेक्षां कमी प्रमाणानें झाली एवढेंच नव्हे तर एकंदर लोकसंख्येंतहि त्यांचें बल कमी होत आहे. दर दहा हजार लोकसंख्येंत इ. स. १८८१ सालीं ७६१७ हिंदु होते ते इ. स. १८९१ सालीं अधिक झाले; त्यावेळीं त्यांचें बल दर दहा हजारांत ७९५१ हें होतें, तें पुढें एकसारखें कमी होत चाललें. इ. स. १९०१ सालीं तें ७८२१ झालें व इ. स. १९११ सालीं तें ७७४५ इतकें झालें. मुसलमानांचें लोकवस्तींत प्रमाण हिंदुंपेक्षां अधिक वाढत आहे.

वर इ. स. १८९१ सालीं हिंदूंचें लोकवस्तींत प्रमाण वाढलें असें दाखविणारे आंकडे दिले आहेत ते पूर्णपणें खरे नव्हत; कां कीं त्यांच्यामध्यें वन्य हिंदूंच्या आंकड्यांनीं घोंटाळा केला आहे. वन्य जाती कधीं हिंदू म्हणवून घेतील, कधीं घेणार नाहींत, व त्या आपणांस काय म्हणवून घेतात हें सांगणार कोण तर खानेसुमारीच्या काम करणारांपैकीं अत्यंत अशिक्षित असा फार्म भरून आणणारा गणक (एन्युमरेटर). त्या बिचाऱ्यास प्रत्येक प्रश्नाचा अर्थ काय हें समजण्यास देखील कठीण पडेल. आपणांस वृद्धिक्षयाचें खरें प्रमाण समजण्यासाठीं हिंदू आणि वन्य यांची बेरीज करून प्रमाण काढलें पाहिजे.

साल,	दर हजारीं प्रमाण.		
	हिंदू.	वन्य.	एकत्र.
१८८१	७६१७	३९८	८०१५
१८९१	७९५३	१०८	८०६१
१९०१	७८२१	३७	७८५८
१९११	७७४५	११८	७८६३

या मुंबई इलाख्यांतील आंकड्यावरून असें दिसून येईल कीं हिंदु व वन्य असे निरनिराळे काढलेले आंकडे एकत्र केले तरी हिंदूंचें बल एकंदर लोकसंख्येंत कमी होत चाललें आहे.

मुंबई इलाख्यांत असें दिसतें कीं मुसलमानांचें प्राबल्य महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रापेक्षां अधिक आहे तथापि महाराष्ट्रांतहि (कोंकण व दक्षिण भाग यांत) मुसलमानांचें प्रमाण वाढत आहे.

साल.	मुंबई शहर.		गुजराथ.		कोंकण.		डेक्कन.		कर्नाटक.		सिंध.	
	हिंदु.	मुसलमान.	हिंदु.	मुसलमान.	हिंदु.	मुसलमान.	हिंदु.	मुसलमान.	हिंदु.	मुसलमान.	हिंदु.	मुसलमान.
१८८१	६५०४	२०५३	७८६६	१०३५	९११४	५७४	८८४१	५४५	८७३२	९८०	१२६२	७८०८
१८९१	६६१२	१८८९	८६२२	१००१	९१३४	५७९	९१५२	५६३	८६७०	१०४९	१९७४	७७०५
१९०१	६५५४	२००७	८२८०	१०८९	९१४७	५८५	९१८८	५८५	८६४६	१०७१	२३४०	७६१९
१९११	६७८०	१८३१	८३१४	१०७३	९१३४	५९४	९०७९	५७५	८६४२	१११२	२३८३	७५१४

† बेने-इस्रायल काळे आहेत म्हणून त्यांचा गोरे यहुदी तिरस्कार करतात, व त्यांच्याशीं लग्नव्यवहार करीत नाहींत. ते अधिक संपन्न झाल्यास त्यांच्या बरोबर लग्नव्यवहार सुरू होईल असा एकंदर परिस्थिति पाहून अजमास करतां येईल.

सिंधमध्यें मात्र हिंदूंचें प्रमाण वाढत आहे आणि याचें एक मुख्य कारण सिंधमधील हिंदूंची सांपत्तिक स्थिति चांगली आहे हें होय.

जाती.		संख्या.	जातींतील लोकसंख्येपैकीं हिंदूंचें शेंकडा प्रमाण.
ओराओन	...	८३०९९	६
आंध	...	५२३७८	१००
कवार	...	२२९४१२	८८
कोर्कु	...	१५२३६३	५६
कोल	...	८२५९८	७१
कोलम	...	२४९७६	२७
कोर्वा	...	३४०००	१४
कोळी	...	३६१४६	१००
खर्वार	...	१९६५१	९२
गोंड	...	२३१७४८४	१६
धन्वार	...	१८६३७	७६
नहल	...	१२४०३	७१
नागासिया	...	४४१६५	९०
बिंझ्वार	...	५८७३३	९०
बैगा	...	३०३९१	६
भरिया-भूमिया	...	५१००६	४५
भिल्ल	...	२७७८५	८९
भुइन्हार	...	४४०२९	३७
भैना	...	१७३८७	९७
रौतिया	...	१२०३७	१००
सांवता	...	१०४०३	३०
सावरा	...	७४१८१	९५
हळबी	...	१००२११	१००
इतर	...	३६१४२	३५

२५. **वन्य हिंदूंविषयीं पुन्हा एकदां**–कोंकणांत वन्यांची एकंदर संख्या ७४ आहे. दख्खनमध्यें पंचाण्णव हजार आहेत म्हणजे दर दहा हजारीं प्रमाण १४९ पडतें. वन्यांचें मुख्य क्षेत्र म्हटलें म्हणजे वऱ्हाड व मध्यप्रांत हें होय. यासाठीं त्यांच्यापैकीं कितीजणांवर हिंदुत्वाचीं पुटें चढलीं आहेत हें पहाणें अवश्य आहे.

गोंड, कोर्कु इत्यादि जातींत हिंदुपणा कमी आहे तथापि त्यांपैकीं कांहींमध्यें आहे. शिरोगणतीच्या अहवालांत यासंबंधानें एक कोष्टकहि दिलें आहे. त्यांत हिंदु कोण व अहिंदु कोण हें कोणत्या पद्धतीनें ठरवून हे आंकडे तयार केले हें सांगतां येत नाहीं; व यामुळें या कोष्टकाचें महत्त्व सांगतां येत नाहीं. सामान्य दृष्टीनें हिंदुत्वाचीं लक्षणें पाहून अगर हिंदु ही पदवी कोण कबूल करतो हें पाहून प्रस्तुत कोष्टक अजमासानें तयार केलें असावें त्या कोष्टकावरून नक्की वस्तुस्थिति समजली नाहीं तरी बरीचशी समजते यांत संशय नाहीं.

वन्य जातींपैकीं जे लोक आपण हिंदु आहों म्हणून सांगतात त्यांची वन्य भाषा जाऊन मराठी अगर हिंदी भाषा झालेली असते असें रिपोर्ट सांगतो. (Census of India 1911. Vol X Part I. P. 193.) अर्थात् हिंदु-संस्कृतिस्थापनेसाठीं प्रयत्नाची दिशा आणि संस्कृतसंभव भाषा वाढविण्याच्या प्रयत्नांची दिशा या दोन्ही एकच आहेत. विशिष्ट प्रयत्नानें एक कार्य साधलें तर दुसरेंहि साधेल. मध्य-प्रांतांतलि एक कोटि साठ लक्ष लोकसंख्येपैकीं एक कोटि अठ्ठावीस लक्ष लोकांस खानेसुमारी हिंदु म्हणते, आणि चोवीस लक्ष लोकांस वन्य म्हणते. प्रत्येक असंस्कृत जातींतील कांहीं लोकांस हिंदु आणि इतरांस वन्य म्हणण्याचा रिवाज त्यांत दिसून येतो. एकंदर गोंडांपैकीं तेवीस लक्ष गोंड ब्राह्मणोपाध्याय अगर हिंदु देवता यांस मानीत नाहींत म्हणून रिपोर्ट लिहितो. वन्य गोंड एकोणीस लक्ष सहासष्ट हजार म्हणून दिले आहेत. आणि दोन लक्ष सदुसष्ट हजार गोंड हिंदु म्हणून लिहिले आहेत. एखाद्या जातींतील ' खानेसुमारीवाल्यांचें हिंदुत्व ' आलेल्या आणि ' खानेसुमारी वाल्यांचें हिंदुत्व ' न आलेल्या लोकांचे आंकडे एकत्र केले. आणि त्या जातींस हिंदुत्व पूर्णपणें पोंचलें नाहीं असें धरून जातींतील सबंध संख्या जमेस धरली तर अशा जातींतील लोकांची संख्या ६३ लक्ष भरते. म्हणजे खरोखर १ कोटि ५३ लक्ष हिंदूंपैकीं ६३ लक्ष लोकांमध्यें म्हणजे जवळ जवळ शेंकडा चाळीस हिंन्दूं-मध्यें जन्मांतून कधींहि आपल्या कोणत्याहि मुख्य दैवतांची उपासना, अगर ब्राह्मणदर्शन अगर दुसऱ्या कोणी हिंदु मार्गदर्शकाचा उपदेश यांपैकीं कांहीं एक प्राप्त होत नाहीं.

या आंकड्यांवरून आपला कर्तव्यावधि कळण्याजोगा आहे. हिंदुसंस्कृतीच्या वन्यांत होणाऱ्या प्रसारानें त्या वन्यांचा हिंदु समाजामध्यें अधिक अंतर्भाव होऊन समाजाचें घटनादार्ढ्य वाढण्यास मदत होते. मराठी व हिंदी भाषांचा पगडा गोंडांवर पडला म्हणजे गोंड अधिक पक्के हिंदु होतात. भाषाप्रसार केवळ भाषेचा प्रसार करावयाचा ह्या बुद्धीनें

होत नाहीं, व इतरांवर आपली भाषा लादण्याचा कोणी प्रयत्न केला, तर द्वेष मात्र वाढणार. भाषाप्रसाराची योग्य पद्धति म्हटली म्हणजे भाषेच्या द्वारें कांहीं महत्त्वाचें देणें ही होय. आंता स्वभाषासंवर्धनाचा विचार करूं.

२६. **महाराष्ट्रसंवर्धन**—महाराष्ट्रधर्मार्थ आपलें मध्यप्रांताविषयीं आतांपर्यंतचें जें विवेचन झालें तें केवळ "हिंदु" या दृष्टीनें व हिंदु या भावनेनें झालें, आतां कांहीं विवेचन महाराष्ट्रीय दृष्टीनें, आणि महाराष्ट्रीय भावनेनें केलें पाहिजे. ज्या प्रमाणें आपणांस हिंदुस्थानचें हिंदुत्व कायम राखावयाचें आहे त्या प्रमाणें महाराष्ट्राचें महाराष्ट्रीयत्व संवर्धन करावयाचें आहे. मध्यप्रांत हा भोंसल्यानीं ताब्यांत घेतला हें पूर्वकालीन "महाराष्ट्र धर्म वाढवावा" या रामदासी ध्येयाचें परिणत फल होय. तथापि तें ध्येय आपणांस पूर्वीच्या तऱ्हेनें पार पाडतां येणार नाहीं. एके काळीं महाराष्ट्र फार लहान होतें, जाणि आज तें बरेंच मोठें झालें आहे. आणि भोंसल्यांचें राज्य जर कायम असतें तर तें त्याहूनहि मोठें झालें असतें, महाराष्ट्र सध्यां वाढत आहे हें आपण जर चांदा जिल्ह्याकडे लक्ष दिलें तर समजण्यासारखें आहे. सुमारें ५० वर्षांपूर्वी चांदा जिल्ह्यामध्यें मराठी भाषा निम्मेहून कमी होती, आतां ती दोन तृतीयांश लोकांची भाषा आहे. आणि तेथील गोंड वगैरे वन्य भाषा बोलणारे लोक दुसरी कोणची भाषा न बोलतां मराठी भाषाच कायमचे बोलतात. बस्तर येथील लोकांपैकीं शेंकडा ३० लोकांची भाषा मराठीच आहे, आणि आज जरी तेथें गोंडी भाषेचें प्राबल्य आहे तरी लिहिण्याची भाषा गोंडी नसल्यामुळें ती मर्त्य आहे. आज बस्तर येथें हिंदी बोलणाऱ्या लोकांची संख्या शेंकडा ६ प्रमाणें आहे. तथापि पुढें मागें हिंदीचें प्राबल्य होऊन महाराष्ट्र संवर्धनास व्यत्यय येईल. याजबद्दल आपण काळजी घेतली पाहिजे. बस्तर येथील शिक्षण मराठींत व्हावें, व उत्तम प्रकारें व्हावें अशी आपण काळजी घेतली पाहिजे. हरिदास, पुराणिक रवाना केले पाहिजेत. तुकारामाची गाथा घेऊन भजनी बुवाहि तेथें गेले पाहिजेत. आणि गोंडांपैकीं "प्रधाना" सारख्या परमार्थोद्यम करणाऱ्या जातींस उत्तम प्रकारें मराठी शिक्षण देऊन आणि भजन शिकवून बस्तरी गोंडांत काम करण्यास पाठविले पाहिजेत. गोंडांचे परंपरागत उपाध्ये अगर पारमार्थिक गुरु म्हटले म्हणजे पाडळ, पाठाडी, प्रधान, आणि देसाई इत्यादि गोंडांध्याच पोट जातींतील जाती होत. त्यांचा उपयोग केला पाहिजे.

२७. **गोंडांची आधुनिक स्थिति**—गोंडांचा इतिहास फार मनोरंजक आहे. आज मितीस सुमारें २४ लक्ष गोंड मध्यप्रांतांत आहेत. ज्या जाती मूळ गोंडांतल्याच आहेत तथापि ज्या जाती निरनिराळ्या वर्णिल्या आहेत, अशा गोंडांच्या जाती (म्हणजे उदाहरणार्थ हळबी, प्रधान, ढोली, चिमनाओझा, इत्यादि जाती) घेतल्या तर त्यांची संख्या अधिकच होईल. गोंडांपैकीं मुख्य भाग आपल्याच प्रांतांत आहे. आणि कांहीं गोंड ओरिसांत आहेत. आणि कांहीं मध्य हिंदुस्थानांत आहेत. ओरिसामध्यें २ लक्ष ३६ हजार गोंड आहेत. यांपैकीं ४२२१ लोकांनीं आपली भाषा गोंडी म्हणून सांगितली, आणि उरलेल्या सर्व लोकांची भाषा उडिया झाली आहे. याचा अर्थ ओरिसामध्यें ५० गोंडांपैकीं एकास स्वतःची भाषा येते. मध्य हिंदुस्थानामध्यें जे सुमारें २ लक्ष ३५ हजार गोंड आहेत. त्या गोंडांची भाषा "गोंडी" या शब्दांनींच वर्णली जाते. तथापि ती खरी गोंडी भाषा नसून माळव्यांतील सामान्य लोकांच्या गोंडी भाषेचा अपभ्रंश होय. (Census of india 1911. Vol XV. Page 86) या गोंडांचीं एकंदर चार राज्यें होती. एक राज्य जबलपूरनजीक गढमंडळ येथें असे. अत्यंत दक्षिणचें राज्य म्हणजे चांद्याचें. देवगड व खेरला टेंकडी हीं दोन इतर राज्यें होतीं.

बाराव्या शतकापूर्वी गोंड राजे एकदां मगधच्या अशोकाचे, व पुढें गुप्तराजांचे मांडलीक होते. आणि कधीं कधीं वऱ्हाडच्या राजाचे मांडलीक असत. गोंडवनांत रजपुतांचा प्रवेश झाला. आणि त्यांनीं येथील लोकांवर आपला ठसाहि उमटविला, तथापि त्यांनीं फारसा मुलूख जिंकला नाहीं. हैहय नांवाच्या रजपुत कुलाचें एक राज्य नाहीं म्हणावयास होतें तें रत्नपुर येथें होतें व तें सातशें वर्षे चाललें होतें. तथापि तें भोसल्यांनीं नाहींसें केलें. येणेंप्रमाणें सुसंस्कृत आर्य जातींचा पगडा चोहोंकडे बसला होता, तरी गोंडांचीं राज्यें अस्तित्वांत होतीं. आणि कांहीं गोंड संस्थानें अझूनहि शिल्लक आहेत. गोंडांमध्यें थोर सान असे अनेक वर्ग आहेत. थोर वर्गात कोईतोर नांवाचा वर्ग आहे. कोईतोर म्हणजे क्षत्रिय असे एक इंग्रज (Sir R. Jenkins) म्हणतो आणि दुसरा (Rev. Hislop) † तसें नाहीं असें म्हणतो. कांहीं असो, य,

† Papers relating to original tribes of the Central Provinses left in Manuscript by the Late Rev. Stephen Hislop. Published R. Temple C. C. of C. P. 1866,

कोईतुरांमध्यें क्षत्रियाचार आहे. हे लोक जानवीं घालतात. क्षत्रिय ह्मणवितात. आणि सोंवळें इतकें आहे कीं त्यांनां लाकडें देखील भिजवून घेतलीं पाहिजेत. या कोईतुरांमध्यें राजगोंड, रघुवाल, दादावे, आणि कत्तुलिया इत्यादि उपभेद आहेत. यांच्यामध्यें उपाध्ये देखील आहेत. त्यांचीं नांवें वर आलींच आहेत. त्याशिवाय ढोली, ओझ्या आल, कोलीला, भूतल, थोटिआल, या जराशा कनिष्ट प्रकारच्या पारमार्थिक उद्यम करणाऱ्या जाती आहेत. तसेंच त्यांच्यामध्यें वैश्य नांवाचा एक वर्ग आहे. त्यास कोईगोपाळ ह्मणतात. सध्यां १०–१२ गोंडांचीं घराणीं संस्थानिकांची आहेत. आणि १२५ सांवर लहान मोठ्या गोंडांच्या जमीनदाऱ्या आहेत. खैरागड आणि बस्तरमंडळ येथील घराणीं आपणांस रजपूत समजतात, आणि म्हणतात, आणि तोच कित्ता इतरांनीं उचलला आहे.

याप्रमाणें थोडक्यांत गोंडांची स्थिति आहे.

२८. **महाराष्ट्रसंवर्धनाच्या दृष्टीनें आपलें गोंडांसंबंधीं कर्तव्यः**—जातां जातां आपण येथें असा विचार करूं कीं या गोंडांचें भवितव्य काय ? गोंडांची मूलभाषा बहुतेक नष्ट झाली आहे आणि आज जी थोडी बहुत आहे ती नष्ट होण्याच्या मार्गी लागली आहे. उडिया, तैलंगी, हिंदी, आणि मराठी या चार भाषा गोंडी भाषेचा संकोच करीत आहेत.

गोंडांच्या भाषेंत ग्रंथ नसल्यामुळें आणि गोंडांची भाषा आज लिहावयाची नसल्यामुळें, गोंडी भाषा नष्ट व्हाव-याचीच, आणि यासाठीं ज्या गोंडांची भाषा आज गेली नाहीं, त्या गोंडांनीं उत्तरकालीं मराठी बोलावें, अगर हिंदी बोलावें, हा प्रश्न सुटावयाचा आहे, आणि त्याअर्थी स्वहितदृष्टीनें तो आपणांस सोडवावयाचा आहे. हिंदी भाषेचा प्रसार गोंडांत होण्यास एक प्रमुख कारण आहे. आणि तें कारण ह्मटलें ह्मणजे मध्यप्रांताचा बराचसा भाग हिंदुस्थानी बोलणारा आहे एवढेंच नव्हे तर गोंडांबरोबर रजपूतांचीं लग्नें होत असल्यामुळें इतर वन्य लोकांचा आपल्यांत अंतर्भाव करून घेण्याची रजपुतांची व हिंदी भाषेची शक्ति वृद्धिंगत होत आहे. तथापि आपल्यांतील मराठे लोक राजगोंडांवरोबर देखील लग्नें कर ण्यास तयार नाहींत. आणि यामुळें महाराष्ट्रसंवर्धनास व्यत्यय येत आहे. गोंडांचें रक्त आज महाराष्ट्रीय ह्मणविणारांत नाहीं असें नाहीं. पुष्कळदां, मराठे कुणबी, अगर देशमुख गोंडिणी ठेवितात. आणि त्या गोंडिणीपासून जी संतति होते, ती आपणांस आह्मी मराठें आहोंत, असें ह्मणवून घेते. आणि एखाद दुसरी पिढी उलटल्यानंतर त्यांच्या ठायीं मराठेपणा पक्का कायम होतो. आज मराठे आणि गोंड यांची उघडउघड लग्नें झालीं पाहिजेत. तीं घडून येण्यासाठीं गोंडांच्या घरचा आचार, कुणबी, मराठे, यांच्या घरांतील आचारासारखा असला पाहिजे. महाराष्ट्रीय ब्राह्मणानें गोंडाकडे सत्यनारायण करावयाचा झाल्यास त्याच्या प्रत्यक्ष घरीं न करितां त्याच्या शेजारच्या कुणब्याच्या घरींच करावयाचा असें करूं नये. भिक्षुक हा मोठा राष्ट्रसंवर्धक आहे. तो खरा सुधारक आहे. तो जेथें जेथें जातो, तेथें तेथें असंस्कृतामध्यें हिंदुत्व स्थापन करतो. प्रथमतः सत्यनारायण करतो, कधीं कांळीं मंत्र सांगतो प्रसंगीं भागवत किंवा हरिविजयाची पोथी सांगून लोकशिक्षण करतो. आणि येणेंप्रमाणें तो आपल्या शक्तीप्रमाणें हिंदुत्वाचें बल वाढवितो. पुराणोक्त कर्में तो असंस्कृतांस लावून देतो. आणि अडाणी लोकांच्या वन्य पूजेस व्यवस्थित स्वरूप देऊन चातुर्वर्ण्यसंस्कृतींत त्यांस ओढतो. राष्ट्रीय घटना करूं इच्छिणाऱ्यानें या भटाभिक्षुकांचें महत्त्व विसरतां कामा नये.

२९ **महाराष्ट्रसंवर्धन आणि परदेशगमनः**—एका कारणामुळें महाराष्ट्रसंवर्धनास आणि महाराष्ट्रीयत्व प्रसारास अधिक मदत होणें शक्य आहे. आणि तें कारण म्हटलें म्हणजे महाराष्ट्रीयांचा प्रसार हें होय. महाराष्ट्रीयांचा जो प्रसार होत आहे. तो राष्ट्रसंवर्धनाच्या दृष्टीनें होत आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. एखाद्या लोकांनीं आपला मुलूख सोडून दुसरीकडे जाणें, हें कांहीं दृष्टीनें राष्ट्रास हितावह आहे व कांहीं दृष्टीनें नुकसानकारक आहे. एखादे लोक आपल्या जवळच्याच मुलखांत पुष्कळ गेले तर ते तो जवळचा मुलुख आपलासा बनवितील, तथापि ते फार दूरच्या मुलुखांत गेले तर ते तो मुलुख आपला न बनवितां परक्या लोकांचा ते अंश बनतील. राष्ट्रसंवर्धनाच्या, ह्मणजे अधिक प्रदेशावर आपल्या राष्ट्राची भाषा वाढावी या दृष्टीनें आपल्यापैकीं हजारों लोकांनीं जवळच्या मुलुखांत जाणें हें अधिक फायदेशीर आहे.

३०. **मध्यप्रांतीय चलनवलनाचें मापनः**—या विषयावर विचार करितानां प्रथमतः चलनवलन प्रवृत्तीच समजली पाहिजे. आणि नंतर तिचें नियमन स्वेच्छेनें कसें करावें, आणि कसें करतां येईल याबद्दलचा विचार करूं.

आपण प्रथमत: एकंदर लोकसंख्येंत चलनवलनाची प्रवृत्ति कितपत आहे हें पाहूं. गेल्या दहा वर्षांत सर्व हिंदुस्थानभर प्रवासाच्या सोईमुळें व इतर कारणानें चलनवलन वाढलें आहे. गेल्या दहा वर्षांमध्यें मध्यप्रांतांतच पूर्वीच्या सवापट माणसें आपला जिल्हा सोडून दुसऱ्या जिल्ह्यांत रहाण्यास तयार झालीं. इ. स. १९०१ सालीं आपला जिल्हा सोडणारे वीस लक्ष लोक इतर जिल्ह्यांत मोजले गेले आणि इ. स. १९११ सालीं चोवीस लक्ष लोक परक्या जिल्ह्यांत मोजले गेले. संयुक्त मध्यप्रांत (वऱ्हाड व मध्यप्रांत) आणि इतर ब्रिटिश मुलुख यांचीच तुलना केली तर आपणांस असें दिसून येईल कीं, आपल्या प्रांतांतून जाणाऱ्या लोकांपेक्षां एक लक्ष छप्पन हजार लोक आपल्या प्रांतांत जास्त आले आणि मध्यप्रांताखेरीजकरून जीं देशी संस्थानें आहेत त्यांशीं तुलना केली असतां असें दिसतें कीं तिकडे गेले त्यापेक्षां दोन लक्ष बावीस हजार अधिक लोक देशी संस्थानांतून मध्यप्रांतांत अधिक आले. एवंच संयुक्त मध्यप्रांत हा परकीय लोकांचा संग्रह करणारा मुलुख आहे.

३१. वैदर्भीय चलनवलन—आतां फक्त वऱ्हाडांतील स्थिति आपण पाहूं. वऱ्हाडांतच ज्यांचा जन्म झाला आहे असे लोक इ. स. १९११ सालीं सर्व हिंदुस्थानांत सत्तावीस लक्ष त्रेचाळीस हजार होते. आणि त्याच काळीं वऱ्हाडची लोकसंख्या तीस लक्ष होती. वरील सत्तावीस लक्ष त्रेचाळीस हजार लोकांपैकीं सुमारें चौऱ्याहत्तर हजार लोक वऱ्हाड सोडून बाहेर गेले; आणि वऱ्हाडमध्येंच जे मोजले गेले अशांची संख्या सवीस लक्ष सत्तर हजार सांपडते. म्हणजे वऱ्हाडमध्यें सुमारे चार लक्ष लोक बाहेरून येऊन रहात आहेत असें दिसतें. वऱ्हाडपैकीं वऱ्हाडच्या बाहेर जे लोक जातात त्यांपैकीं सुमारें पन्नास हजार लोक नागपूरकडील महाराष्ट्रांत गेले आणि उरलेले लोक इतर मुलुखांत गेले. वऱ्हाडची महाराष्ट्राबाहेर गेलेली लोकसंख्या तेवीस हजार आहे. ही कोठें गेली व कशी गेली याचा आपण विचार करूं. या तेवीस हजारांपैकीं बहुतेकांचा हिशोब पांच जिल्ह्यांचे आंकडे घेतले असतां लागतो.

पांच जिल्ह्यांत गेलेली लोकसंख्या येणेंप्रमाणें, बैतुल ४३२८, नेमाड ६७९१, छिंदवाडा २१६४, चांदा ९००४, बालाघाट ३६७ म्हणजे एकूण २२६५४ मंडळीचा हिशोब लागला. या बहिर्गमनाच्या योग्यायोग्यतेचा विचार करण्यासाठीं वर सांगितलेल्या प्रत्येक जिल्ह्याची भाषाविषयक स्थिति आपण लक्षांत घेऊं. बैतुल येथील ३९० हजार लोकसंख्येपकीं १९६ हजार हिंदी बोलणारे आहेत. आणि १११ हजार गोंडी बोलणारे आहेत आणि मराठी बोलणारे आज फक्त ९० हजार आहेत. मराठीस तेथें प्रतिस्पर्धी भाषा गोंडी नसून हिंदीच होणार. गोंडांचें काय ? ते लोक ज्या लोकांचें प्राबल्य अधिक ती भाषा बोलतील. बैतुल जिल्ह्यास मराठी करण्यास मराठी भाषेस आपल्याहून दुप्पट सामर्थ्याशीं झगडावयाचें आहे.

नेमाड जिल्ह्यामध्यें २५६ हजार हिंदी बोलणारे लोक आहेत, ५४ हजार मराठी बोलणारे आहेत आणि फक्त ६ हजार गोंडी बोलणारे आहेत. म्हणजे येथें हिंदी भाषेच्या आपल्याहून पांचपट सामर्थ्याशीं मराठी भाषेस झगडावयाचें आहे.

छिंदवाडा जिल्ह्यांत ५१४ हजार लोकसंख्या आहे, २६० हजार हिंदी भाषेची लोकसंख्या आहे, १४९ हजार गोंडी भाषेचें बल आहे, आणि ९८ हजार मराठी भाषेचें बल आहे. म्हणजे छिंदवाड्यामध्यें हिंदी भाषेचें बल मराठी भाषेच्या बलाच्या अडीचपटीनें आहे.

बालाघाट जिल्ह्यामध्यें निरनिराळ्या भाषांचें बल मिळून जर ३८८ हजार धरलें तर हिंदीचें बल २२५ आणि मराठीचें ९९ आहे. आणि गोंडीचें बल ५९ आहे. शिवणीमध्यें सर्व भाषांचें बल मिळून ३९५ आहे. फक्त हिंदीचेंच २६० आहे आणि मराठीचें २९ आहे. म्हणजे बालाघाटमध्यें हिंदीचें बल मराठीच्या आठपटीहून अधिक आहे.

वऱ्हाडांतील बाहेर जाणारे लोक जेथें मराठी व हिंदी यांची स्पर्धा आहे अशा ठिकाणीं जाऊन मराठी बोलणारांस कुमक करीत आहेत हें उघड आहे. स्थलांतराच्या इष्टानिष्टतेविषयीं सांगतांना हें सांगितलें पाहिजे कीं,

(१) वऱ्हाडांत आलेले चार लाख लोक पुढें मागें महाराष्ट्रीय झाले तर वऱ्हाडचें बाहेरून लोक आल्यानें हित झालें असें समजावें.

(२) जिकडे आपले लोक जातात तिकडे संख्येनें आपलें प्राबल्य लवकर होईल असें केलें पाहिजे; व या दृष्टीनें पहातां बैतुल, बालाघाट आणि चांदा या जिल्ह्यांत गेलेले लोक महाराष्ट्रसंवर्धनाच्या कामीं पडतील.

३२. महाराष्ट्रीय चलनवलनास स्वेच्छानिर्णीत दिशा देतां येईल काय?—आपल्या लोकांनीं कोठें जावें हें उपदेशानें ठरत नसतें; हें सोयीनें ठरत असतें. यासाठीं आगगाड्यांविषयींची व्यवहारनीति या धोरणानुसार ठरवावी. बैतुल आणि बालाघाट येथें महाराष्ट्राच्या हृदयांतून तडक जातां येईल अशी सोय झाली पाहिजे. आज तशी स्थिति नाहीं. बैतुल आणि बालाघाट यांस महाराष्ट्रास चांगलें जोडणारी रेलवे पाहिजे म्हणून सरकारपाशीं ओरडलें पाहिजे. तसेंच बस्तर संस्थानाकडे हिंदी मुलुखांतून आगगाडी न जातां चांद्याकडून गेली पाहिजे. बस्तर येथें शेंकडा ३० मराठी आहे आणि शेंकडा सहा हिंदी आहे. छत्तीसगडांतून बस्तरकडे रेलवे आली तर बस्तरचा तयार होऊं लागलेला मराठीपणा नष्ट होईल. आगगाड्या करतांना ज्याप्रमाणें सांपत्तिक आणि लष्करी धोरण असतें तसेंच सामाजिक धोरण देखील असतें. महाराष्ट्रवृद्धीच्या दृष्टीनें सरकारकडून त्या धोरणाचें आपण नियमन करवावें.

३३. महाराष्ट्रसाक्षरता व वाङ्मयस्थिति:—वाङ्मयकल्याणेच्छूनें एकंदर भाषा बोलणारांची संख्या अवलोकिली पाहिजे. एकंदर महाराष्ट्रीय म्हणजे महाराष्ट्राचे भविष्यकालीन ग्राहक. यांपैकीं सुशिक्षित वर्ग म्हणजे वाङ्मयाचे आजचे ग्राहक. लिहितां वाचतां येत असेल तर मनुष्य ग्रंथ वाचणार व विकत घेणार. विकत घेणारा वर्ग असेल तर पुस्तकें तयार होणार. यासाठीं महाराष्ट्रांतील साक्षरतेचा अजमास केला पाहिजे. साक्षरतेसंबंधानें आपण आंकडे पाहूं लागलों तर आपणांस पुष्कळ गोष्टींविषयीं आश्चर्य वाटेल. प्रथमत: थोडक्यांत सांगावयाचें झटल्यास असें सांगतां येईल कीं महाराष्ट्रांत साक्षरता फार कमी आहे एवढेंच नव्हे, तर गुजराथेंतलि साक्षरवर्गाच्या प्रमाणापेक्षां महाराष्ट्रांतील साक्षरवर्गाचें प्रमाण फार अल्प आहे. कानडी मुलखापेक्षां देखील महाराष्ट्रांत साक्षरता कमी आहे हें कानडा, धारवाड, बेळगांव, विजापूर या जिल्ह्यांच्या आंकड्यावरून दिसून येईल. सिंध येथील हिंदूंमधील साक्षर हिंदूंचें प्रमाण महाराष्ट्रांतील हिंदूंतील साक्षर हिंदूंच्या प्रमाणापेक्षां फारच अधिक आहे. पण याला एक कारण आहे. सिंधमधील जनता मुसलमान असून हिंदु विशेषेंकरून व्यापारांत व सरकारी नोकरींत आहेत.

वाङ्मयाच्या हितेच्छूनें साक्षर स्त्रीवर्गाच्या संख्येकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. कारण देशी भाषेंतील ग्रंथांचा खप साक्षर स्त्रीवर्गामुळें विशेष होतो. सुशिक्षित पुरुषांस आपल्या बौद्धिक गरजा भागविण्यास इंग्रजी पुस्तकें लागतात, आणि ते परमार्थपर व मनोरंजक पुस्तकें बायकांसाठीं विकत घेतात. अशी परिस्थिति असल्यामुळें देशी वाङ्मयाच्या खपास स्त्रीशिक्षण फारच अनुकूल आहे. आणि तें गुजराथेंतील स्त्रीवर्गाचें प्रमाण महाराष्ट्राच्या निदान सहापट आहे.

प्रत्येक भाषा बोलणारांमध्यें साक्षर किती व निरक्षर किती याचे आंकडे उपलब्ध नाहींत. आणि यासाठीं, दर जिल्ह्याचे साक्षरतेचे आंकडे दिले आहेत. त्यांवरून महाराष्ट्रीय साक्षरतेची कल्पना येईल. जिल्ह्यांतील हिंदु स्त्रीपुरुषांच्या साक्षरतेचे आंकडेहि दिले आहेत, ते अशा करतां कीं महाराष्ट्रीय जनतेची अधिक खरी कल्पना या आंकड्यांनीं होईल.

या शिक्षणविषयक आंकड्यांचें नीट मनन झालें पाहिजे. स्वत:च्या शिक्षिततेबद्दल गर्व बाळगणाऱ्या महाराष्ट्रानें हें कोष्टक काळजीपूर्वक पहावें. म्युनिसिपालिट्यांच्या व डिस्ट्रिक्ट बोर्डांच्या सभासदांनीं तसेंच स्त्रीशिक्षणाच्या कैवाऱ्यांनीं, या कोष्टकाकडे पाहून आपल्यापुढें कामें किती आहेत याचा विचार करावा.

दर हजारीं लिहितां वाचतां येणारे (मध्यप्रांत व मुंबई इलाखा)

देश भाग.	सर्व वस्तींत.	दहा वर्षांवरील वस्तींत.	हिंदु पुरुषांत.	हिंदु स्त्रियांत.
अहमदाबाद ...	१२६	१५९	१७७	२३
भडोच ..	१५४	२०१	२८३	२४
कैरा ...	९८	१२५	१५९	१५
पंचमहाल ...	५०	७०	७७	६
सुरत ...	१४१	१८६	२२२	२२
कानडा ...	८८	११२	१५३	१५
कुलाबा ...	४९	६६	८३	५
रत्नागिरी ...	४३	५९	८७	३
ठाणें ...	६०	८०	८०	९
अहमदनगर ...	४६	६१	६७	३
पूर्व खानदेश ...	४९	६७	९०	२
पश्चिम खानदेश.	४२	५९	८०	३
नाशिक ...	४४	५९	६८	३
पुणें ...	७५	९७	१०१	१२
सातारा ...	३६	४८	६२	२
सोलापूर ...	४७	६२	८०	३
बेळगांव ...	४६	६१	७८	३
विजापूर ...	४७	६२	९२	२
धारवाड ...	७७	१०१	१४७	६
वर्धा ...	४७	६२	९४	२
नागपूर ...	५४	७१	८७	४
चांदा ...	२४	३२	४९	१

देश भाग.	सर्व वस्तींत.	दहा वर्षांवरील वस्तींत.	हिंदु पुरुषांत.	हिंदु स्त्रियांत.
भंडारा ...	२७	३७	५३	१
बालाघांट	२९	४०	६१	२
उमरावती ...	५१	६८	९६	३
अकोला ...	४३	५८	७६	२
बुलठाणें ...	४१	५६	७५	२
यवतमाळ ...	२७	३७	५०	१
सागर ...	४८	६६	७२	३
दमो	४६	६३	७७	३
जबलपूर ...	६०	८२	१०३	४
नरसिंगपूर ...	४९	६८	१००	३
हुशंगाबाद ...	५६	७४	१०८	३
नेमाड ...	५६	७६	९७	३
मक्राई ...	४९	...	१२९	२
मुंबई शहर ...	२२७	...	२२६	५९
गुजराथ ...	११७	१५२	१८०	१८
कोंकण ...	५५	७४	९४	६
दख्खन ...	४९	६५	७९	४
कर्नाटक ...	५८	७६	१०७	४
सिंध ...	४७	...	२३३	१७
वऱ्हाड व मध्यप्रांतांतील मराठा मुलुख ...	३९	५२	७२	२
नर्मदा विभाग.	५४	७३ मक्राई वगळून	९३	३

या कोष्टकावरून ज्या ठळक गोष्टी दिसून येतात त्या येणें प्रमाणें.

(१) गुजराथी लोकांत महाराष्ट्रीयांपेक्षां साक्षरांची संख्या दुप्पटीहून अधिक आहे. सिंधमधील हिंदु पुरुषांमध्यें साक्षरांचें प्रमाण दख्खन मधील हिंदु पुरुषांच्या सुमारें तिप्पट आहे. कर्नाटकांतील साक्षर वर्ग दख्खन मधील साक्षर वर्गाच्या शेंकडा ३६ या प्रमाणानें अधिक आहे. महाराष्ट्रांतील तीन निरनिराळ्या भागांकडे पाहतां, कोंकण, दख्खन व मध्यप्रांतांतील (वऱ्हाडासह) मराठी मुलुख अशी नंबरवारी लागते. कोंकणांत कानडाचा अंतर्भाव केल्यामुळें कोंकणाचा नंबर वर लागत आहे. कानडा वगळला तर कोंकण खालीं येईल. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जिल्ह्यांतील हिंदूंमध्यें असलेल्या साक्षर पुरुषवर्गाच्या प्रमाणानें जर जिल्ह्यांचा अनुक्रम करावयाचा असेल तर तो येणें प्रमाणें होईल.

(१) मुंबई शहर (२) पुणें (३) उमरावती (४) वर्धा (५) पूर्व खानदेश (६) नागपूर व रत्नागिरि (७) कुलाबा (८) ठाणें, सोलापूर व पश्चिम खानदेश (९) अकोला (१०) बुलठाणें (११) नाशिक (१२) अहमदनगर (१३) सातारा (१४) बालाघाट (१५) भंडारा (१६) यवतमाळ.

हिंदुस्त्रीशिक्षणाच्या बाबतींत अनुक्रम येणें प्रमाणें:—(१) मुंबई शहर (२) पुणें (३) ठाणें (४) कुलाबा (५) नागपूर (६) रत्नागिरि, अहमदनगर, पश्चिम खानदेश, नाशिक, सोलापूर व उमरावती (७) पूर्व खानदेश, सातारा, वर्धा, बालाघाट, अकोला, बुलठाणें (८) चांदा, भंडारा, यवतमाळ. मुंबईस दर हजारीं स्त्रियांमध्यें ५९, पुण्यास १२, ठाण्यास ९. कुलाब्यास ५, नागपुरास ४, रत्नागिरी, अहमदनगर, पश्चिम खानदेश, नाशिक, सोलापूर व उमरावती येथें ३, पूर्व खानदेश, सातारा, वर्धा, बालाघाट, अकोला, बुलठाणें येथें दोन, व चांदा, भंडारा, व यवतमाळ येथें एक हें प्रमाण आहे, यवतमाळ जिल्ह्यांत साक्षर हिंदु स्त्रियांचें जें प्रमाण आहे त्याच्या चोवीसपट भडोच जिल्ह्यांत आहे.

साक्षरतेचा विचार जर आपण वगळला तर ग्रंथप्रसिद्धिविषयक आंकडे अत्यंत विस्मायक होतील, व आपणांस असें वाटेल कीं महाराष्ट्राला झालें आहे तरी काय?

इ. स. १९०१ पासून इ. स. १९१० पर्यंत मुंबई इलाख्यांत मराठी पुस्तकें १८०२ प्रसिद्ध झालीं; मध्यप्रांतांत २४६ प्रसिद्ध झालीं; बडोदें संस्थानांत १९ प्रसिद्ध झालीं. त्याचप्रमाणें मुंबई इलाख्यांत गुजराथी पुस्तकें २५३९ प्रसिद्ध झालीं; मध्यप्रांतांत ५ प्रसिद्ध झालीं व बडोदें संस्थानांत १०२५ प्रसिद्ध झालीं. एकंदर मराठी व गुजराथी पुस्तकांचें या प्रांतांतील मराठी व गुजराथी बोलणाऱ्या लोकसंख्येशीं काय प्रमाण पडतें हें खालील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

प्रांत.	लोकसंख्या मराठी.	लोकसंख्या. गुजराथी.	मराठी पुस्तकें. इ.स. १९०१ते१९११ पर्यंत	गुजराथी पुस्तकें इ. स. १९०१ते१९११ पर्यंत.
मुंबई	९०१६२२८	३३४७४९०	१८०२	२५३९
मध्यप्रांत	४८६५९८०	१७२४१	२४६	५
बडोदें राज्य	३६१४५	१९०१८६८	१९	१०२५
एकंदर	**१३९१८३५३**	**५२६६५९९**	**२०६७**	**३५६९**

वरील कोष्टकावरून असें दिसतें कीं गेल्या दशकांत मराठी बोलणाऱ्या एक लाख लोकवस्तीशीं मराठी प्रसिद्ध पुस्तकांचें प्रमाण १५ आहे; व गुजराथी बोलणाऱ्या एक लाख लोकवस्तीशीं गुजराथी प्रसिद्ध पुस्तकांचें प्रमाण ६८ आहे!

गुजराथी लोकांची आपणापेक्षां शिक्षणविषयक व ग्रंथसंख्याविषयक उच्चता वरील आंकड्यांनीं सहज कळून येईल. याचें कारण काय बरें असावें. याला तीन कारणें देतां येतील. एक तर बडोदें राज्यानें सार्वजनिक शिक्षणासाठीं जी खटपट केली तिचा उपयोग मुख्यत्वेंकरून गुजराथ्यांस झाला. दुसरें एक कारण असें आहे कीं, व्यापारी वर्ग स्वभावतःच साक्षर असतो आणि ज्या लोकांत व्यापारी वर्ग मोठा आहे त्यांत साक्षरतेचें प्रमाण अधिक सांपडावयाचें. याला मध्यप्रांतांतला एक पुरावा आहे. मध्यप्रांतांत दर हजार कोमटी पुरुषांत ४१८ साक्षर लोक आहेत व खोजांत ५४८ आहेत व ब्राह्मणांत ४३१ आहेत. गुजराथी ग्रंथाच्या खपाचें तिसरें कारण म्हटलें म्हणजे स्त्रियांची सुशिक्षितता होय.

गुजराथी लोकांनीं ते व्यापारी म्हणून आपणांस मागें टाकलें असें धरूं आणि महाराष्ट्रीय व बंगाली समाज यांची तुलना करूं.

बंगाल व महाराष्ट्र यांचें अनेक दृष्टींनीं साम्य असून कांहीं बाबतींत यांच्यामध्यें फरक आहे.

उदाहरणार्थ बंगालमध्यें हिंदूंचा उच्च वर्ग शिक्षणाच्या बाबतींत व राजकीय चळवळींच्या बाबतींत पुढें आहे. महाराष्ट्र जवळजवळ तसाच आहे. याशिवाय व्यापार उदीम या बाबतींत बंगाली बोलणारे लोक महाराष्ट्राइतके जरी नाहींत तरी बरेच परतंत्र आहेत. महाराष्ट्राचा व्यापार, परके लोक सोडून दिले तरी, गुजराथी व मारवाडी या अन्य भाषा बोलणाऱ्या

हिंदूंच्या हातीं आहे. बंगालचा व्यापार देखील बराचसा मारवाडी लोकांच्या हातीं आहे. महाराष्ट्रांतील साक्षर वर्ग बहुतेक अंशीं कारकुनी व सुशिक्षित धंदे (उदाहरणार्थ डाक्टरी वकीली) यांवर अवलंबून आहे. बंगाल्यांत स्थिति जवळजवळ तशीच आहे. पण तेथें हा एक फरक आहे कीं, तेथील बराचसा सुशिक्षित वर्ग जमीनदार आहे; आणि त्यामुळें ग्रंथग्राहकवर्ग आम्हांपेक्षां बराचसा संपन्न आहे. बंगालमधील ब्राह्मण, कायस्थ, वैद्य यांखेरीज सर्व सामान्य बंगाली लोक व ब्राह्मण व परभू खेरीज इतर महाराष्ट्रीय यांची तुलना केली असतां एक महत्त्वाचा भेद दृष्टीस पडतो. मराठी भाषेच्या क्षेत्रांत चोहोंकडे पसरलेल्या आपणांकडे दोन जाती आहेत; ह्या म्हटल्या म्हणजे मराठे आणि महार होत. बंगालमध्यें मराठ्यांसारखी जात नाहीं, तैलंगी भाषेच्या क्षेत्रांत "तेलगा" नांवाची जात आहे, ओरिसामध्यें "उडिया" म्हणून जात आहे पण बंगालमध्यें बंगाली अशी जात नाहीं. महाराष्ट्रांतले ब्राह्मण परभू जरी नष्ट झाले तरी मराठ्यांच्या जातीच्या अस्तित्वामुळें महाराष्ट्राचें ऐक्य राहील पण बंगालमध्यें तसें नाहीं. प्रत्येक जिल्ह्यांत कुणबी मराठ्यांचे सामाजिक पद उपभोगिणाऱ्या निरनिराळ्या जाती आहेत. बंगालभर पसरलेली सर्व सामान्य जात म्हटली म्हणजे नामशूद्रांची होय तथापि या जातीची सामाजिक पदवी महारासारखी आहे.

स्वकीय व्यापारी वर्ग नसलेल्या बंगाल व महाराष्ट्र या दोन देशांत जरी साम्यता आहे तरी त्यांच्यामध्यें फरक आहेच; आणि तो फरक ग्रंथप्रसिद्धीवर परिणाम घडवितो. १९०१ पासून १९११ पर्यंतच्या दशकांत बंगाल प्रांतात बंगालींत दहा हजारांवर (१०५३५) पुस्तकें प्रसिद्ध झालीं आणि मराठींत त्याच्या चतुर्थांश देखील नसावींत ना, असा विचार येऊन वाईट वाटतें. तथापि एकंदर परिस्थिति लक्षांत घेतली असतां वस्तुस्थिति प्रथम जितकी खेदकारक दिसते तितकी ती नाहीं. दोन कोट महाराष्ट्रीयांपैकीं एक कोटी अडतीस लक्ष म्हणजे शेंकडा सत्तर लोक फक्त ब्रिटिशमुलुखांत आहेत, व उरलेल्या तिसांपैकीं निजामशाहींत शेंकडा १८ लोक आहेत. निजामशाहीमध्यें मराठी वाङ्मय बहुतेक तयार होतच नाहीं. त्यास तेथिल राजकीय परिस्थिति अत्यंत अनिष्ट आहे. बंगालमध्येंच बंगाली बोलणाऱ्या लोकांची संख्या सवाचार कोटी आहे. सवाचार कोटी लोकसंख्येस जर दहा हजार पांचशें पुस्तकें धरलीं तर एक कोटी अडतीस लाख वस्तीच्या ब्रिटिश महाराष्ट्रांत सवातीन हजार तरी पुस्तकें पडावयास पाहिजेत. पण आपलीं दहावर्षांतील पुस्तकें सवादोन हजारांच्या जवळ आहेत. यावरून बंगाली लोकांशीं तुलना करतांहि आपण ग्रंथप्रकाशनाच्या बाबतींत किती मागें आहोंत हें दिसून येईल.

हा असा फरक कां पडावा. बंगाल महाराष्ट्रापेक्षां श्रीमंत आहे ही गोष्ट केव्हांहि नाकबूल करतां येणार नाहीं. बंगालमध्यें जमीनदारांचा वर्ग मोठा श्रीमान आहे; तथापि ही गोष्टच मुख्य कारण असेल असें नाहीं. कारण वाङ्मयाचा भोक्ता असा हा वर्ग नसतोच. जमीनदारांत वाङ्मयभोक्ता वर्ग जरी असला तरी वाङ्मयाची ग्राहकता त्याच्या अस्तित्वामुळें विशेष वाढत नाहीं. काहीं थोडेसे बंगाली जमीनदार, कधीं खपणें शक्य नसणारें वाङ्मय म्हणजे, कविता करून त्याचीं लठ्ठ पुस्तकें छापवून वांटून टाकतात, पण असल्या प्रकारांनीं वाङ्मयविस्तार कितपत होणार. बंगाली वाङ्मय बंगाल्यांतील सुशिक्षित मध्यम वर्गावर अवलंबून आहे, आणि त्याचें मुख्य कारण शिक्षणविस्तार हेंच होय. बंगालमध्यें दर हजारीं ७७ लोक साक्षर आहेत. दर हजार पुरुषांत १४० पुरुष साक्षर आहेत आणि १००० स्त्रियांत १४ स्त्रिया साक्षर आहेत. शिवाय बंगालमध्यें बंगाली भाषा बोलणाऱ्यांचें प्रमाण शेंकडा ९१ आहे. महाराष्ट्रापेक्षां बंगालेंच स्थूल दार्ढ्य अधिक आहे.

ग्रंथाचें लोकसंख्येशीं प्रमाण काढण्यासाठीं वर काढलेल्या हिशोबाप्रमाणें हिशोब करतां इतर भाषांचें प्रमाण आढळून येतें तें येणें प्रमाणें. त्रावणकोरमध्यें दरलक्ष तामिळांस ११ पुस्तकें प्रसिद्ध होतात व दरलक्ष मलयाळींस ३२ होतात. खुद्द मद्रास इलाख्यांत प्रत्येक भाषा बोलणाऱ्या लाख वस्तीस प्रसिद्ध पुस्तकांचें प्रमाण तामिळांस १९, तेलुगूस १०, मलयाळींस २५, व कानडी लोकांस ३४, याप्रमाणें पडतें. अर्थात् या सर्वांपेक्षां गुजराथी भाषेतील पुस्तकांची वस्तीच्या मानानें संख्या अधिक आहे.

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांतील दहा वर्षांवरील लोकसंख्येंत साक्षरांचें प्रमाण काय आहे याविषयीं माहिती दिलीच आहे. चांगल्या सुशिक्षित देशांत व जातींत दहावर्षांवरील वस्तींत साक्षरांचें प्रमाण येणेंप्रमाणें:—युनायटेडस्टेट्समध्यें इ. स. १८८१ सालीं शेंकडा ८३; १८९१ सालीं शेंकडा ८६.७; १९०१ सालीं ९०; १९११ सालीं ९२.३ असें

आहे शेवटच्या खानेसुमारींत गोऱ्या जन्मतः अमेरिकनांत शेंकडा ९७, परदेशाहून आलेल्या गोऱ्या लोकांत शेंकडा ७७.२ आणि निग्रोंमध्यें ६९.५ असें होतें.

हिंदुस्थानांतील जातींपैकीं दहावर्षांवरील पारशांत शेंकडा ७५ हें प्रमाण आहे.

३४. वाङ्मयप्रवर्तक—मराठी बोलणारे आणि त्यांतील साक्षरवर्ग यांच्या वृद्धिक्षयाविषयीं विचार म्हणजे वाङ्मयाच्या बाजारांतील गिऱ्हाइकांविषयींचा विचार झाला आंता बाजारांत माल आणणाऱ्यांविषयीं विचार करूं. माल घेणारा वर्ग म्हणजे साक्षरवर्ग होय आणि माल तयार करणारा वर्ग म्हणजे सुशिक्षितवर्ग होय. प्रत्येक सुशिक्षित मनुष्य लेखक बनत नाहीं. कविता नाटकें आणि कादंबऱ्या यांचा लेखकवर्ग पाहिला तर ज्यांची लेखनप्रवृत्ति लहानपणापासून असते व जे बहुतांशीं स्वयंशिक्षित असतात अशांचाच हा बनला असतो. लेखनांत केवळ मनोरंजनाचाच हेतु असेल तर सामान्यतः कोणत्याहि जातीचा मनुष्य लेखक होतो. तथापि सामाजिक व राजकीय प्रश्नावर लेखक लिहिण्यास प्रवृत्त झाला म्हणजे त्या लेखकाची अगर त्याच्या जातीची समाजांतील पदवी त्या लेखकाच्या लिहिण्याची दिशा ठरविते. लेखक इंग्रज असला व तो सिव्हिल सर्व्हिसचा अवयव असला म्हणजे स्वतःस सरकार अगर शास्त्यांचा अंश समजून लोकांनीं काय करावें व सरकारनें काय करावें हें लिहील. लेखक हिंदी असला तर सरकारनें काय करावें याविषयीं गाऱ्हाणीं सांगत लिहील. अर्थात् सामाजिक व राजकीय विषयावर लिहिण्यास लेखक प्रवृत्त होतो तो अधिकाराच्या भावनेनें, अगर गाऱ्हाणीं करण्याच्या भावनेनें होतो. कांहीं अत्यंत थोडके लोक तात्त्विक वादविवादाचा भाग म्हणून असल्या प्रश्नावर लिहिण्यास प्रवृत्त होतात.

सामाजिक व राजकीय विषयावर उपयुक्त वाङ्मय मराठींत निर्माण व्हावयास महत्त्व असलेला, जबाबदारी ओळखणारा आणि कर्तृत्व असलेला वर्ग समाजांत पाहिजे आणि त्याचें समाजावरील वजन बरेंचसें स्थिर असलें पाहिजे त्याअर्थीः—

समाजांतील उच्चवर्गाचें वजन समाजावर कमी होत आहे कायः—या प्रश्नाचा विचार वाङ्मयाची सुस्थिति असावी असें इच्छिणाऱ्यांस अवश्य आहे. समाजांतील उच्चवर्ग जर नाहींसा झाला. व त्याची जागा कोणी भरून काढली नाहीं, तर सामाजिक प्रश्नावर विचार तरी कोण करणार ? समाजाच्या मानसिक गरजा कोण पुरविणार ? समाजांत जर एखाद्याचें महत्त्व असेल तर त्याची सामाजिक विचार करण्याला प्रवृत्ति होते, त्याशिवाय होत नाहीं. यासाठीं समाजांतील उच्च उच्च वर्गाचें वजन कसें काय कमी होत आहे याविषयीं विचार करून उपाय योजना करणें अवश्य असतें. समाजांतील उच्च वर्गाचें समाजावर वजन खालील गोष्टींनीं कमी होतें.

(१) त्या समाजावर परकीय राज्य आलें असतां समाजांतील उच्च व जबाबदार वर्ग असतो त्याचेंच वजन कमी होते.

(२) परकीय भाषेंतील प्रावीण्यास महत्त्व मिळाल्यामुळें स्वकीय भाषेंत प्रावीण्य मिळविणारांचें महत्त्व कमी झालेंच.

(३) समाजांतील उच्चवर्ग आपलें कार्य न करितां इतर सामान्य कार्यांत ह्मणजे वैश्यशूद्रांशीं स्पर्धा करण्यांत मग्न झाला ह्मणजे त्याचें महत्त्व कमी झालेंच.

(४) समाजांतील उच्चवर्गाचा संख्याक्षय होऊं लागला म्हणजे देखील त्याचें महत्त्व लयास जाण्याच्या पंथास लागलें.

वर सांगितल्यापैकीं पहिली गोष्ट आज समाजाच्या हातांतली मुळींच नाहीं. देशाच्या राज्यकारभारांत आपला हात शिरावा म्हणून होणाऱ्या चळवळीस ज्या मानानें यश येईल त्यामानानें आपल्यांतील लोकांस अधिक महत्त्व येईल, व त्या महत्त्वाचा वाङ्मयावर परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. देशी भाषेस अधिक महत्त्व शासनतंत्रांत मिळालें तर समाजांतील उच्चवर्गाचें महत्त्व वाढेल. पण ही गोष्ट देखील पराधीन आहे. उच्चवर्गाच्या महत्त्वक्षयाच्या वर सांगितलेल्या तिसऱ्या कारणाविषयीं विचार करण्यापूर्वीं सहज दिसणारी गोष्ट जी संख्येचा क्षय आणि संख्येची वृद्धि इकडे लक्ष दिलें पाहिजे.

उच्च जातींचा क्षय:—प्रथम हिंदुस्थानांतील निरानिराळया मुख्य जातींच्या वृद्धिक्षयाकडे, लक्ष देऊं. उच्चवर्गीचें कोष्टक आपणांस मिळणार नाहीं.

सर्व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींचे वृद्धिक्षय दाखविणारें कोष्टक.

जात	लोकसंख्या			वृद्धिक्षयाचें प्रमाण		
	१९११	१९०१	१८९१	१९०१ ते १९११	१८९१ ते १९०१	१८९१ ते १९११
कापु (तेलुगु)	३३६१६२१	३०७०२०६	२६६५३९९	+ ९.५	+१५.२	+२६.१
कायस्थ	२१७८३९०	२१४९३३१	२२३९८१०	+ १.४	− ४.०	− २.७
गुजर (मुख्यत: पंजाबी)	२१९९१९८	२१०३०२३	२१७१६२७	+ ४.६	− ३.२	+ १.३
जाट (पंजाबी कुणवी)	६९६४२८६	७०८६०९८	६६८८७३३	− १.७	+ ५.९	+ ४.१
नायर (मलबारीशेतकरी.)	११२९४६६	१०४६७४८	९८०८६०	+ ७.९	+ ६.७	+१५.२
परैया (तामिल अंत्यज)	२४४८२९५	२२५८६११	२२१०९८८	+ ८.४	+ २.२	+१०.७
ब्राह्मण	१४५९८७०८	१४८९३२५८	१४८२१७३२	− २.०	+ .५	− १.५
महार	३३४२६८०	२९२८६६६	२९५०५६८	+१४.१	− .७	+१३.३
मापिला (मलबारी मुसलमान)	१०४६८३४	९२५१७८	९१६४३६	+१३.१	+ १	+१४.२
रजपूत	९४३००९५	९७१२१५६	१०४२४३४६	− २.९	− ६.८	− ९.५
वेल्लाल (तामिळ कुणवी)	२६०३०८९	२४६४९०८	२२५४०७३	+ ५ ६	+ ९.४	+१५.५

